14 वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२३ ■ मंगळवार, दि.२ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



## निवडणूक आयोगाने सांगितले.....

# शेतकरी कर्जमाफीची घोषणा करू नका... !

## सीएम देवेंद्र फडणवीसांनी दिली माहिती

प्रतिनिधी २ जून

**मुंबई :** राज्यात महायुतीचं सरकार आल्यास शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची घोषणा राज्यकर्त्यांनी निवडणूक काळात केली होती. त्यानुसार, शेतकऱ्यांना जून महिन्यात कर्जमाफी दिली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. मात्र, आता शेतकरी कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राज्यातील शेतकरी कर्जमाफीचा निर्णय अंतिम टप्प्यात आला असून निवडणूक आयोगाच्या निर्देशामुळे कर्जमाफीची अधिकृत घोषणा बाकी आहे. कर्जमाफीच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे, विधान परिषद निवडणुकीनंतर शेतकरी कर्जमाफीची घोषणा होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना आणि शेतकरी कर्जमाफी यांच्यासंदर्भात माहिती दिली. शेतकरी कर्जमाफी योजना आज मंत्रिमंडळ बैठकीत चर्चिली जाईल. मात्र, निवडणूक आयोगाने आम्हाला सांगितलं आहे की, तुम्ही घोषणा करू नका. त्यामुळे, शेतकरी कर्जमाफीसंदर्भात आज चर्चा होईल, निर्णय होईल, निर्णयानुसार कारवाई होईल. मात्र, कुठलीही घोषणा होणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.विशेष म्हणजे दोनच दिवसांपूर्वी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत घोषणा केली होती. पुढील १० दिवसांत कर्जमाफीचा निर्णय होईल, असे भरणे यांनी म्हटले होते. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी, अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमातील कृषिमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. त्यानंतर, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज शेतकरी कर्जमाफीचा निर्णय होणार असल्याचे समजते.



### कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांची आत्महत्या

राज्यातील विविध शेतकरी संघटनांच्या नेत्यांकडून कर्जमाफीची सातत्याने मागणी केली जात होती. कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या असून शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येते. त्याचा, परिणाम कर्जफेड न केल्याने सावकाराच्या ओझ्याखाली शेतकरी टोकाचे पाऊल उचलतात. बळीराजाला या कर्जापासून दिलासा देण्यासाठी सरकारने शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेतला आहे. मात्र, राज्यातील किती शेतकऱ्याना या योजनेचा लाभ मिळणार, त्यातील अटी व शर्ती संदर्भात अद्याप कुठलीही माहिती नाही.

### अपात्र बहिणींची संख्या ८० लाखांवर गेली



लाडकी बहीण योजना सुरु झाल्यावर आपण केवायसी सुरु केलं. या योजनेत सरकारी कर्मचारी आहेत, त्यासंदर्भात माहिती घेतली. परिवहन विभाग आहे, चारचाकी डेटाबेसची माहिती घेतली आणि त्यानंतर आपल्या लक्षात आलं, की ५ लाख असे आहेत ज्यांकडे चारचाकी आहे. १४ हजार पुरुषही योजनेतील लाभार्थी निघाले आहेत. अडीच लाख रुपयांपेक्षा उत्पन्न अधिक आहे, असे पण काहीजण निघाले. केवायसी करून घ्या सांगितलं, मात्र ती अद्याप झाली नाही. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेतील अपात्रांची संख्या ८० लाखांवर गेली, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली.

# बाजोरियांचा बंडखोरीचा घरचा अहेर, आमदार बच्चू कडूंच्या नेतृत्वाला सुरुंग !











संदीप मानकर २ जून

**अमरावती :** अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्याच्या राजकारणात प्रचंड धुमश्चक्री उडाली आहे. महायुतीचे उमेदवार आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी अत्यंत दिमाखात आपला नामांकन अर्ज दाखल केला खरा; मात्र अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी, शेवटच्या १५ मिनिटांत बाजोरिया पिता-पुत्रांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या 'सरप्राईज एन्ट्री'ने महायुतीसह शिवसेना आमदार बच्चू कडू यांना थेट 'घरचा अहेर' दिला आहे. शिवसेना शिंदे गटात असलेल्या बाजोरिया पिता-पुत्रांनी थेट बच्चू कडूंचे नेतृत्वच नाकारत बंडखोरीचे निशाण फडकावल्याने राजकीय गोटात खळबळबळ उडाली आहे.

आमदार बच्चू कडू यांनी आपली प्रहार संघटना सोडून शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट त्यांच्यावर विदर्भाची मोठी जबाबदारी सोपवली. पण, हाच निर्णय आता शिंदे गटातील जुन्या नेत्यांच्या जिव्हारी लागल्याचे चित्र आहे. हिंगोलीचे माजी आमदार विप्लव बाजोरिया आणि त्यांच्या वडिलांनी थेट बच्चू कडूंचे नेतृत्व अमान्य करत बंडखोरी केली आहे. त्यामुळे बच्चू कडू यांचे नेतृत्व पक्षातच स्वीकारले जात नाहीये का ? असा बोचरा सवाल आता उपस्थित होत आहे. ४ जून रोजी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विप्लव बाजोरिया माघार घेतात की रिंगणात कायम राहतात, यावरच आता निवडणुकीचे संपूर्ण भवितव्य टिकून आहे.

### अमरावतीच्या आखाड्यात प्रवीण पोटे 'तगडे'

विधान परिषदेच्या आखाड्यात दोनदा विजय मिळवलेले आणि माजी पालकमंत्री राहिलेले प्रवीण पोटे हे साम-दाम-दंड-भेद या सर्व आघाड्यांवर अत्यंत तगडे उमेदवार मानले जातात. कालपर्यंत एकतर्फी वाटणारी ही निवडणूक आता बाजोरियांच्या बंडखोरीमुळे प्रचंड चुरशीची झाली आहे. विशेष म्हणजे, बाजोरियांच्या उमेदवारीला महायुतीमधीलच एका आमदाराचा आणि भाजपच्या एका बड्या नेत्याचा छुपा पाठिंबा असल्याची धक्कादायक चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### राणा दाम्पत्य दिल्लीला

माजी पालकमंत्री प्रवीण पोटे आणि आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्यातील विळया-भोपळयाचे सख्य संपूर्ण जिल्ह्याला ठाऊक आहे. भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांना उमेदवारी मिळावी म्हणून राणा दाम्पत्याने जोरदार फिल्डिंग लावली होती, तसे त्यांनी भाषणातून जाहीरही केले होते. मात्र, पक्षाने राणा दाम्पत्याचा डाव हाणून पाडत पुन्हा प्रवीण पोटे यांच्यावरच विश्वास टाकला. पोटे यांना उमेदवारी जाहीर होताच, नाराजी टाळण्यासाठी राणा दाम्पत्याने थेट दिल्ली दौरा काढला आणि ते अर्ज भरण्याच्या प्रक्रियेतून पूर्णपणे गायब राहिले. याचीच चर्चा काल दिवसभर अमरावतीच्या राजकारणात रंगत होती.

### पोटेंच्या पाठीशी आमदारांची फौज

प्रवीण पोटे यांचा फॉर्म भरताना आमदार खोडके दाम्पत्य, अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्यासह जिल्ह्यातील भाजपचे सर्वच आमदार ताकदीने पाठीशी उभे होते. देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेले उत्तम ट्यूनिंग आणि पोटे यांचे सिनीयॅरिटी पाहता, भविष्यात भाजप त्यांना पुन्हा अमरावतीचे 'फुल टाईम' पालकमंत्री करू शकते, अशी चर्चा जाणकारांमध्ये रंगली आहे.

### अडसूळ पिता-पुत्रांचे पत्ते कायमचे कट

माजी केंद्रीय मंत्री आणि शिवसेनेचे नेते आनंदराव अडसूळ हे प्रवीण पोटे यांच्या फॉर्म भरताना उपस्थित होते खरे, पण बच्चू कडू यांच्या एन्ट्रीमुळे अमरावतीतील अडसूळ पिता-पुत्रांचे पत्ते कायमचे कट झाले आहेत, ही आता काळया दगडावरची रेघ मानली जात आहे. पोटे यांच्याशी असलेल्या संबंधांमुळे ते आले असले, तरी 'आता आपण अमरावतीचे नेते उरलो नाही,' याचे स्पष्ट टेन्शन त्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होते. गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यपाल करण्याचा शब्द दिला होता, असे अडसूळ नेहमी बोलतात, मात्र ते स्वप्नही अद्याप अपूर्ण असल्याने त्यांची नाराजी लपून राहिलेली नाही. अभिजीत अडसूळ यांचेही पुनर्वसन न झाल्याने अडसूळ गटात अस्वस्थता आहे.

# स्वच्छता गृहासाठी पैसे वसुली कायम... !

## आगार क्रमांक एक आणि दोन मध्ये वेगवेगळी परिस्थिती कायम

प्रतिनिधी २ जून




**अकोला:** एसटी चा सोमवारी ७८ वा वर्धापनदिन. या औचित्यावर आज, १ जूनपासून राज्यभरात विशेष स्वच्छता मोहिमेचा गाजावाजा करत शुभारंभ करण्यात आलाय. 'प्रवाशांना एसटीची सर्व स्वच्छतागृहे १ जून पासून मोफत वापरता येतील,' अशी मोठी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली होती. पण अकोला बसस्थानकावर मात्र मंत्र्यांच्या या आदेशाला थेट हरताळ फासल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. अकोल्यात नव्या नियमाचा विसर पडल्यासारखी स्वच्छतागृहासाठी पैसे वसुली सर्रास सुरू होती. अखेर आरआरसीच्या दणक्यानंतर प्रशासनाला जाग आली आणि त्यांनी प्रवाशांचे घेतलेले पैसे परत केले.एकीकडे या तथाकथित मोफत सुविधेसाठी महामंडळाने प्रवाशांच्या खिशात हात घालत १५ एप्रिलपासूनच प्रत्येक तिकिटावर २ रुपयांचा अधिभार लागू केलाय. म्हणजेच प्रवाशांकडून आधीच पैसे वसूल केले जात आहेत. असे असतानाही अकोला आगार क्रमांक १ आणि आगार क्रमांक २ मध्ये कमालीची तफावत आणि वेगवेगळी परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे अकोला बसस्थानकासाठी महामंडळ वेगळा आदेश काढणार का ? असा संतप्त सवाल आता प्रवासी विचारत आहेत.

# पुर्णा पात्रातील अवैध रेती उत्खननाचे पुरावे नष्ट करणे सुरु

प्रतिनिधी २ जून

**अकोला:** रेती माफियांनी एक नाही सहा सहा डोंगे लावून पूर्णा नदीच्या पात्रात रेतीचे उत्खनन केले असताना त्याचे चित्रीकरण उपलब्ध असताना खनिकर्म आणि महसुल यंत्रणा गप्प का असा प्रश्न उपस्थित होत आहे. अकोला आणि दर्यापूर या दोन्ही तहसीलदारांनी या रेती चोरीचा गुन्हा व यंत्रसामग्री जप्तीसाठी प्रयत्न का केले नाही अशी विचारणा आता होत आहे.

दर्यापूरातील लोतखेड आणि अकोल्यातील म्हैसांग येथे पुर्णा नदीच्या पात्रातून हजारो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन व कोट्यावधीचे रेती चा दरोडा सिटी न्यूज सुपरफास्ट उघडकीस आणल्यानंतर या विषयावर दोन्ही जिल्ह्यातील महसुल यंत्रणा गप्पगार का अशी विचारणा होत आहे. आज तर थेट पोकलँड लावून या ठिकाणी झालेले उत्खननाचे पुरावे नष्ट करा असा आदेश खनिकर्म विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्याने दिल्याची माहिती प्राप्त झाली आहे. लोतखेड येथे झालेल्या अवैध रेती उत्खननाचे फुट प्रिंट नष्ट झाल्यावर महसुल यंत्रणा पंचनामा करणार आहे का अशी संतप्त विचारणा आता होत आहे. कोट्यावधीची रेती चोरीला जात असताना खनिकर्म व महसुल यंत्रणा हद्दीच्या मुद्यांवरुन हात का झटकत आहे, या मागे कुठले मोठे रॅकेट कार्यरत आहे काय याचा ही शोध घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.




# 7 जूनपासून 'श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह'

## अधिकमासानिमित्त देशमुख परिवाराचे आयोजन





प्रतिनिधी २ जून

**अकोला:** स्व. श्री पुंडलिकराव बंकटराव देशमुख (अण्णासाहेब) यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ अकोला शहरात भव्य 'श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. अधिक ज्येष्ठ कृष्ण सप्तमी, रविवार दिनांक ७ जून २०२६ ते शनिवार दिनांक १३ जून २०२६ या कालावधीत हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. या कथेचे वाचन प्रसिद्ध ज्योतिषाचार्य आणि वेद परायण कथा वाचक पं. सुदर्शनजी शर्मा 'शास्त्री' (अकोला) हे करणार आहेत. पुरुषोत्तम (अधिक) मासाचे औचित्य साधून आयोजित या ज्ञानगंगेत सर्व भाविकांनी सपरिवार उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे सस्नेह आवाहन आयोजक देशमुख परिवारातर्फे करण्यात आले आहे.

### कथेची वेळ आणि दैनंदिन कार्यक्रम (कथा सोपान)

७ ते १२ जून २०२६
दररोज दुपारी ३:०० ते संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत.

१३ जून २०२६ (अंतिम दिवस): सकाळी ९:०० ते दुपारी १२:०० वाजेपर्यंत




### प्रमुख धार्मिक प्रसंग

- **७ जून (रविवार):** भागवत महात्म्य, भक्तीदेवी अवतरण, मंगलाचरण
- **८ जून (सोमवार):** भीष्म चरित्र, परिक्षित चरित्र, शुकदेव चरित्र.
- **९ जून (मंगळवार):** ध्रुव चरित्र, कपिलोपाख्यान, अजामिलोपाख्यान,
- **१० जून (बुधवार):** वामन चरित्र, गंगावतरण, श्रीकृष्ण जन्मोत्सव.
- **११ जून (गुरुवार):** नंदोत्सव, बाल लीला, छप्पन भोग दर्शन.
- **१२ जून (शुक्रवार):** महा-रास, उद्धव चरित्र, रुक्मिणी विवाह.
- **१३ जून (शनिवार):** सुदामा चरित्र, दत्तात्रय चरित्र, परिक्षित मोक्ष.

### भव्य शोभायात्रा व कथेचे स्थळकथेचा प्रारंभ

- रविवार, ७ जून २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता गोरक्षण संस्थेपासून निघणाऱ्या भव्य शोभायात्रेने होणार आहे. ही शोभायात्रा कथा स्थळापर्यंत मार्गक्रमण करेल. हा संपूर्ण सोहळा 'गोकुल धाम', दत्त कॉलनी, साई मंदिराच्या मागे, गोरक्षण रोड, अकोला येथे संपन्न होणार आहे.

### पूर्णाहुती आणि महाप्रसाद

शनिवार, १३ जून २०२६ रोजी कथेच्या विश्रामानंतर दुपारी १:०० ते ३:०० या वेळेत पुर्णाहूति आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. थेट प्रक्षेपण (Live Broadcast) जे भाविक कथा स्थळी उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांच्यासाठी या कथेचे थेट प्रक्षेपण RRCNetwork, Den CityLive (चॅनल ८८९), GTPL City Live (चॅनल ७३) आणि RRC DIGITAL या यूट्यूब व सोशल मीडिया चॅनेल्सवर केले जाणार आहे.

## जागतिक बाजारपेठेपासून शेतकरी वंचित

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कृषीमाल जागतिक बाजारपेठेत पोहोचावा, या उद्देशाने केंद्र सरकारने ऑगस्ट २०२० मध्ये 'कृषी उडान योजना' सुरू केली. त्यानंतर या योजनाचा विस्तार करून 'कृषी उडान योजना दोन' जाहीर करून त्यामध्ये नव्याने ५८ विमानतळांचा समावेश केला. त्यामध्ये राज्यातील पुणे आणि नाशिक या विमानतळांचा समावेश करण्यात आला. पुणे जिल्ह्याच्या आजूबाजूला असणाऱ्या नगर, सातारा, सांगली कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना योजनेचा लाभ व्हावा, यासाठी पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा समावेश विस्तारित योजनेत करण्यात आला. मात्र, आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये विमान कंपन्या कृषीमालासाठी जागाच देत नसल्याने शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ मिळणे अवघड झाले आहे.

# एमपीएससी, यूपीएससी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांसाठी सुवर्ण संधी

## एसआयएसीची अर्ज प्रक्रिया सुरु ; राहण्या-खाण्याच्या सुविधेसह मिळणार आर्थिक मदत

महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत 'महाराष्ट्र राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था', मुंबई द्वारे नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२७ च्या पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षणासाठी सामायिक प्रवेश परीक्षेची घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील नाशिक, पुणे (यशदा), कोल्हापूर, नागपूर यांसह विविध केंद्रांवर उमेदवारांना मोफत निवास, वाचनालय आणि आर्थिक मदत दिली जाते. या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया १ जून ते १७ जून २०२६ या कालावधीत खुली राहील, तर मुख्य परीक्षा १९ जुलै २०२६ रोजी ऑफलाईन पद्धतीने घेतली जाईल.

महाराष्ट्र राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबई'कडून आयोजित केली जाणारी नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण २०२६ करिता सामायिक प्रवेश परीक्षेची घोषणा करण्यात आली आहे. ही परीक्षा नागरी सेवा परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी महत्त्वाची परीक्षा आहे. यामध्ये उत्तीर्ण झाल्यास उमेदवारांना शासनाकडून स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आर्थिक आणि शैक्षणिक मदत केली जाते. ही परीक्षा महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागामार्फत आयोजित केली जाते. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ. आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकादमी पुणे येथे स्पर्धा परीक्षार्थींना विनामूल्य प्रशिक्षण दिले जाते. वरील संस्थांमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२७ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन १९ जुलै २०२६ रोजी करण्यात येणार आहे. ही परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होणार आहे.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना-**

१. विद्यार्थ्यांचे प्रवेश हे लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील गुणांच्या आधारे ठरवले जाणार असल्याने मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल.
२. सामायिक प्रवेश परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग इन करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.
३. प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिकरित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.
४. सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक**

- ऑनलाईन अर्ज सुरूवात - १ ते १७ जून २०२६
- परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक- १९ जूनपर्यंत
- प्रवेश परीक्षा दिनांक - १९ जुलै
- परीक्षेची पद्धत- ऑफलाइन
- अधिकृत संकेतस्थळ- www.siaced.org.in
- अर्जाची लिंक- https:// formsreced.in/Siac_CET_2026-2027

## जगाचा इतिहास : निर्वसाहतीकरण



यूपीएससी मुख्य परीक्षेत पुढील प्रश्न विचारण्यात आला. १९५६चे सुवेझ संकट येण्यामागे कोणत्या घटना कारणीभूत ठरल्या, त्या घटनांनी ब्रिटनच्या जागतिक शक्ती म्हणून असलेल्या प्रतिमेवर शेवटचा आघात कसा घडवून आणला...याच प्रश्नांवर एक नजर...

निर्वसाहतीकरणाचे युग सुवेझबद्दलचा प्रश्न अभ्यासक्रमातील निर्वसाहतीकरणाच्या धड्याशी संबंधित आहे. वसाहतवादनीतीची परिणती दोन घातक महायुद्धांमध्ये झाली. यामुळे सर्वच युरोपीय सत्ता दुर्बळ झाल्या. या काळात पुढे आलेल्या नवीन महासत्ता अमेरिका व रशिया यांनी निर्वसाहतीकरणासाठी दबाव टाकायला सुरुवात केली. युनोनेही तशी मागणी केली.

सुंभ जळाला पण... युरोपीय सत्ता या महायुद्धांनी भरडून निघाल्या, तरी त्यांचा वसाहतवादी तोरा उतरला नव्हता. आशियातून माघार घ्यायची वेळ आली तरी इतक्यात आफ्रिका व पश्चिम आशिया सोडण्याचा त्यांचा विचार नव्हता. व्यापारासाठी व वसाहतींचे हितरक्षण करण्यासाठी सुवेझ कालवा बांधला. त्याची मालकी संयुक्तपणे ब्रिटन व फ्रान्सकडे होती. इजिप्त स्वतंत्र झाले तरी हे देश सुवेझ सोडायला तयार नव्हते. आमची ही खासगी संपत्ती आहे, असे त्यांचे म्हणणे होते. अरब राष्ट्रवादाचा उदय वसाहतवादाच्या युगात अरब राष्ट्रांनाही त्याचे चटके बसले. त्यातून अरब राष्ट्रवादाचा उदय झाला. साहजिकच तो अशा अरब देशात झाला, जो देश लोकसंख्येने मोठा व विचारांनी प्रगत होता. तो म्हणजे इजिप्त. इजिप्तमध्ये राजेशाही उलथवून अब्दुल गमाल नासेर यांनी आपले सरकार स्थापन केले. त्यांच्या भाषणांनी अरब जग प्रभावित झाले. त्यांनी अरब स्वातंत्र्य व ऐक्याचा विचार लोकांमध्ये रूजवला.

सुवेझचं राष्ट्रीयीकरण सुएझ कालव्याचं राष्ट्रीयीकरण करण्यात आलं आहे, असं नासेर यांनी जाहीर केलं. त्यांनी साधा सरळ हिशेब मांडला, 'या कालव्यातून मिळणारं तीन कोटी पन्नास लाख पौंडांचं वार्षिक उत्पन्न आस्वान धरण बांधण्यासाठी वापरण्यात येईल. इजिप्तचा विकासाचा मार्ग आता कुणीही अडवू शकणार नाही.' नासर यांची घोषणा हा सर्वांसाठी मोठा धक्का होता. ब्रिटन व फ्रान्सचं सुवेझमध्ये भांडवल गुंतलं होतं. त्यामुळे या कालव्यातून रोज येणारं उत्पन्नं दोघांचं होतं. १९६८पर्यंत या कालव्यावर या दोघांचा हक्क राहणार होता. अजून करार संपण्यासाठी १२ वर्षांचा अवधी होता. त्यांना न सांगताच नासेर यांनी हा एकतर्फी घेतलेला निर्णय त्यांना झोबणं साहजिक होतं. अँथनी ईडन यांचा संताप अनावर झाला होता. त्यांनी नासर यांच्यावर 'मुस्लिम मुसोलिनी' अशी मुक्ताफळं उधळली. फ्रेंच प्रमुखांनी नासेर यांचे 'क्रांतीचे तत्त्वज्ञान' पुस्तक नाचवत, त्याची तुलना हिटलरच्या 'माइन काम्फ' शी केली.

आस्वान धरणाचे स्वप्न नासेर यांनी नाइल नदीवर आस्वान धरण बांधण्याचा महाकाय प्रकल्प हाती घेतला. त्याच्यामुळे इजिप्तमध्ये हरित क्रांती होणार होती. शेतीचा विकास होणार होता, वीजनिर्मिती होऊन उद्योगधंद्यांना चालना मिळणार होती आणि पूर व दुष्काळाचा धोका टळणार होता. या धरणानं इजिप्तची ३० टक्के जमीन हिरवी होणार होती. इजिप्तचं रूप पालटणार होतं. तो देश विकसनशील देशांच्या पंक्तीत बसणार होता. पिरॅमिडच्या देशात हे विकासाचं पिरॅमिड उभं करण्याचं नासर यांचं स्वप्न होतं. मात्र पाश्चात्यांनी पैसे द्यायला नकार दिल्यावर नासर यांचं विमान उतरलं मॉस्कोला. तिथे निकिता क्रुश्चेव्ह यांनी धरण बांधण्यासाठी १२० कोटी डॉलर्सचं कर्ज दिल्यावर त्यांना आभाळ ठेंगणं झालं. मात्र तेही पुरणार नव्हते. त्यानंतर त्यांनी पुढचं धाडसी पाऊल टाकलं.

तिघांचा बेत ठरला ब्रिटन, फ्रान्स व इस्त्रायल या तिघांनी गुपचूप एक करार केला. इस्त्रायल इजिप्तवर हल्ला करणार, मग इजिप्त-इस्त्रायल या दोघांचे भांडण सोडवण्याचे निमित्त करून ब्रिटन-फ्रान्स मध्ये पडणार, अर्थातच ते पुन्हा एकदा सुवेझवर ताबा प्रस्थापित करणार. आक्रमणाला सुरुवात २९ ऑक्टोबर, १९५६ या दिवशी इस्त्रायलनं ठरल्याबरहुकूम सिनाई प्रांतावर हल्ला केला. इजिप्तची फार तयारी नव्हतीच. दोन दिवसांत या वाळवंटाचा बराचसा भाग इस्त्रायलनं काबीज केला. इजिप्तच्या सैन्याला बाजूला हटवून इस्त्रायलनं तांबड्या समुद्रात सहज प्रवेश मिळवला. नासेर यांच्या हातात त्याच्या या धाडसाकडे हात चोळत बघत बसण्याशिवाय काही उरलं नाही. राष्ट्रवादांची अभिव्यक्ती ब्रिटिश आणि फ्रेंचांनी कालव्याच्या कामगारांना दुसऱ्या दिवशी आदेश दिला, 'कालव्याचं काम बंद करा.' या दुकलीला वाटलं, 'आपल्या कुशल कामगारांशिवाय कालवा कसला सुरू राहतोय? कालवा ठप्प पडला की इजिप्त ताळ्यावर आलंच.' पण या दुकलीनं लढवलेली ही शक्कल कालव्याच्या पाण्यात वाहून गेली. नासेर यांनी इजिप्शियन कामगारांना आदेश दिला, 'राष्ट्रावर आलेल्या या संकटसमयी झटून काम करा. कालव्यातून होणारी वाहतूक बंद पडू देऊ नका.' राष्ट्रभक्तीनं प्रेरित झालेल्या इजिप्शियन कामगारांमुळे कालवा बंद पडला नाही. ऑपरेशन मस्केटिअर इजिप्तवर या द्वयीनं हवाई हल्ला सुरू केला होता. इजिप्तची विमानं वगैरे जाळून झाल्यावरही नासेर शांत बसलेत, हे बघून ही जोडी अजून चिडली. पाचव्या दिवशी उभयतांच्या फौजा भूमध्य सागरातल्या सायप्रस बेटावरून इजिप्तच्या पोर्ट सैद बंदरावर पोहोचल्या. हा इजिप्तवर सरळसरळ हल्ला होता. आता नासेर संतापले. पण करणार काय? त्यांनी फक्त रेडिओला साथीला घेतलं. आक्रमण करणाऱ्यांवर खरपूस टीका चालू केली. ते जगाला ओरडून सांगत होते, 'इजिप्तवर ब्रिटन आणि फ्रान्सनं केलेला हल्ला हा युनोच्या नियमांचा भंग करणारा आहे. वसाहतवादी शक्तींना त्यांचे वसाहतवादाचे दिवस संपलेत, हे समजायला हवं.' या हल्ल्यानंतर इजिप्तनं तत्काळ युनोकडे धाव घेतली. या युरोपियन मुजोरीवर अरब जगात जळजळीत प्रतिक्रिया उमटली.

## पिकांच्या पेरणी पूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक



कृषी क्षेत्रामध्ये उत्पादन वाढ आणि उत्पादकता संतुलित ठेवण्याचे प्राथमिक उद्दिष्ट राहिले आहे, आणि म्हणुनच उत्पादन तसेच उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट बियाण्याचा वापर करणे अनिवार्य आहे. उत्कृष्ट बियाण्याच्या निवडीनंतर त्यावर चांगल्या प्रकारची बीजप्रक्रिया करणे तितकेच महत्वाचे ठरते; कारण पेरणीनंतर अनेक प्रकारचे रोग मुलत: बिजापासून उदभवतात आणि पसरत असतात.

तात्पर्य बियाण्याला बुरशी, कीटक तसेच असामान्य परिस्थिती पासून संरक्षण करण्यास बीजप्रक्रियेचा मोलाचा फायदा होतो. बीज प्रक्रियेमुळे पिकास होणारे फायदे-बीजप्रक्रियेमुळे सशक्त आणि गुणवत्तायुक्त रोपे तसेच कीड आणि रोग मुक्त रोपे मिळतात. बुरशीनाशकांच्या बिजप्रक्रीयेमुळे बियाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांचे नियंत्रण होते - लहाण बिया (दाणे) असणारी पिके, भाजीपाला आणि कापूस इ. पिकावर बीजप्रक्रिया करणे महत्वाचे ठरते.

कीटकनाशकांच्या बिजप्रक्रीयेमुळे बियाण्याचे किडींपासून संरक्षण होते - बियाण्याची साठवणूक करण्यापूर्वी त्याला योग्य त्या किटक नाशकाची प्रक्रिया करूनच त्याची साठवणूक करावी, त्यामुळे गुणवत्ता टिकून राहते.

बुरशीनाशकांच्या बिजप्रक्रीयेमुळे जमिनीतून पसरणाऱ्या रोगांचे नियंत्रण - जमिनीतील बुरशी, जीवाणू आणि सूत्राकृमी सुत्रकृमिंपासून बीज आणि उगवण झालेल्या रोपांचे संरक्षण होण्यास मदत मिळते. बुरशीनाशकांच्या बिजप्रक्रीयेमुळे बियाण्याच्या उगवण क्षमतेत वाढ होते - पेरणीसाठी वापरण्यात येणाऱ्या बियाण्याला योग्य त्या किटकनाशकाची आणि बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्यास कीड आणि बुरशीपासून संरक्षण होऊन उगवण क्षमतेत वाढ होते परिणामी पेरणीसाठी अधिक बियाणे वापरावे लागत नाही. त्यामुळे पेरणीपूर्वी बियाण्यांची बीज प्रक्रिया करणे आवश्यक असते. तसेच बियाणे वापरताना आधी त्याची उगवणक्षमताही तपासण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस किंवा पेरणीयोग्य पाऊस पडल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## दिन विशेष

### भारतीय चित्रपटसृष्टीचे पहिले शोमन



आज पुण्यतिथी

राज कपूर हे भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिले शोमन म्हणून ओळखले जातात, ज्यांनी त्यांच्या चित्रपटांद्वारे प्रेक्षकांच्या हृदयात एक विशेष स्थान निर्माण केले. १४ डिसेंबर १९२४ रोजी पेशावर (आता पाकिस्तान) येथे जन्मलेले राज कपूर जेव्हा मॅट्रिकच्या परीक्षेत एका विषयात नापास झाले तेव्हा त्यांनी त्यांचे वडील पृथ्वीराज कपूर यांना सांगितले, 'मला अभ्यास करायचा नाही, मला चित्रपटांमध्ये काम करायचे आहे. मला अभिनेता व्हायचे आहे. मला चित्रपट बनवायचे आहेत.'

राज कपूर यांचे शब्द ऐकून पृथ्वीराज कपूर यांचे डोळे आनंदाने चमकले. राज कपूर यांनी १९३५ मध्ये आलेल्या 'इन्किलाब' या चित्रपटातून बाल कलाकार म्हणून आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात केली. अभिनेता म्हणून त्यांचा पहिला चित्रपट 'नील कमल' हा १९४७ मध्ये प्रदर्शित झाला. 'नील कमल' या चित्रपटातील राज कपूर यांच्या कामाची कहाणी खूपच रंजक आहे. पृथ्वीराज कपूर यांनी त्यांचा मुलगा राज याला केदार शर्माच्या युनिटमध्ये क्लॅपर बॉय म्हणून काम करण्याचा सल्ला दिला. चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान, तो अनेकदा आरशाकडे जाऊन केस विंचरायचा. टाळ्या वाजवताना तो कॅमेरासमोर आपला चेहरा ठेवण्याचा प्रयत्न करायचा. एकदा, विषकन्या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान, राज कपूरचा चेहरा कॅमेरासमोर आला आणि घाईघाईत, पात्र अभिनेत्याची दाढी क्लॅपबोर्डमध्ये अडकली. असे म्हटले जाते की केदार शर्माने राज कपूरला बोलावून जोरदार थापड मारली. तथापि, केदार शर्माला रात्री उशिरा पश्चाताप झाला. दुसऱ्या दिवशी त्यांनी राज कपूरला त्यांच्या नवीन चित्रपट 'नील कमल' साठी साइन केले. राज कपूरला फक्त अभिनयापेक्षा जास्त काही करायचे होते. १९४८ मध्ये त्यांनी आरके फिल्म्सची स्थापना केली आणि आगची निर्मिती केली. १९५२ मध्ये प्रदर्शित झालेला 'आवारा' हा चित्रपट राज कपूरच्या चित्रपट कारकिर्दीतील एक महत्त्वाचा चित्रपट ठरला. या चित्रपटाच्या यशामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली. चित्रपटाचे शीर्षक गीत, 'आवारा हूँ या गरदीश में आसमान का तारा हूँ,' हे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप लोकप्रिय झाले. अभिनेत्री नर्गिससोबतची त्यांची जोडी राज कपूरच्या चित्रपट कारकिर्दीतील एक अतिशय लोकप्रिय वैशिष्ट्य होती. हे दोघे पहिल्यांदा१९४८ च्या 'बरसात' चित्रपटात एकत्र दिसले. यानंतर या दोन्ही कलाकारांनी अंदाज, जान पहिन, आवारा, अनहोनी, आशियाना, अंबर, आह, धुन, पापी, श्री ४२०, जगते रहो आणि चोरी चोरी यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले. श्री ४२० चित्रपटातील 'प्यार हुआ इकरार हुआ' या गाण्यातील पावसात एका छत्रीखाली नर्गिस आणि राज कपूर यांच्या प्रेमप्रकरणाचा अविस्मरणीय दृश्य सिनेमाचे प्रेक्षक क्वचितच विसरतील.

राज कपूर यांनी त्यांच्या चित्रपटांद्वारे अनेक लपलेल्या प्रतिभांना संधी दिली. यामध्ये संगीतकार शंकर जयकिशन, गीतकार हसरत जयपुरी, शैलेंद्र आणि पार्श्वगायक मुकेश अशी मोठी नावे होती. १९४९ मध्ये राज कपूर यांनी शैलेंद्र आणि हसरत जयपुरी यांच्या गीतकार म्हणून आणि शंकर जयकिशन यांनी संगीतकार म्हणून बरसात चित्रपटाद्वारे कारकिर्द सुरू केली. १९७० मध्ये राज कपूर यांनी 'मेरा नाम जोकर' हा चित्रपट तयार केला, जो बॉक्स ऑफिसवर प्रचंड अपयशी ठरला. त्यांच्या 'मेरा नाम जोकर' या चित्रपटाच्या अपयशामुळे राज कपूर यांना खूप धक्का बसला. त्यांना मोठे आर्थिक नुकसानही सहन करावे लागले. त्यांनी भविष्यात चित्रपटाची निर्मिती केली तर ते मुख्य अभिनेता म्हणून काम करणार नाहीत असा निर्धार केला. मुकेश यांना राज कपूरचा आवाज म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. मुकेश यांनी त्यांनी अभिनय केलेल्या सर्व चित्रपटांमध्ये त्यांच्यासाठी पार्श्वगायन केले. मुकेश यांच्या मृत्यूनंतर राज कपूर म्हणाले, 'असे दिसते की मी माझा आवाज गमावला आहे.' राज कपूर यांना त्यांच्या चित्रपट कारकिर्दीत अनेक सन्मान आणि मान्यता मिळाली. त्यांना १९७९ मध्ये पद्मभूषण आणि १९८७ मध्ये हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान दादासाहेब पालके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना अभिनेता म्हणून दोनदा आणि दिग्दर्शक म्हणून चार वेळा फिल्मफेअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज कपूर यांचा शेवटचा चित्रपट, 'राम तेरी गंगा मैली', १९८५ मध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर, राज कपूर त्यांच्या महत्त्वाकांक्षी चित्रपट 'हिना' च्या निर्मितीमध्ये व्यस्त झाले, परंतु त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले आणि २ जून १९८८ रोजी त्यांचे निधन झाले.

## जाहीर नोटीस


**संदर्भ :-** मोहन अण्णाजी कांबळे, रा.मु.पो. वडगाव माहोरे, वडगाव, जि. अमरावती यांचा अर्ज प्राप्त

दिनांक : २३/०२/२०२६

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मोहन अण्णाजी कांबळे, रा. मु.पो. वडगाव माहोरे, वडगाव, जि. अमरावती यांनी त्यांच्या भावाच्या मृत्युची नोंद महानगरपालिका दप्तरी घेणे करिता अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने दिनेश अण्णाजी कांबळे यांचा मृत्यु दिनांक १९/०८/२०२४ रोजी नागपूर महानगर पालीका क्षेत्रात झाला किंवा कसे? तसेच त्यांच्या कुटुंबातील रहीवासाची व कुटुंबातील सदस्यांच्या जन्म/मृत्यु बाबतची संपुर्ण माहिती संदर्भात स्थनिक चौकशी /पंचनामा करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल या कार्यालयात तात्काळ सादर करावा.

## गो.नी. दांडेकर



गोपाल नीलकंठ तथा गो.नी. दांडेकर(ज्यांना गोनीदा असेही म्हणतात) हे एक अनुभवसंपन्न, सृजनशील, रसिकवृत्तीचे कलावंत व लेखकही होते. तसेच गो.नी.दा. हे परिभ्रामक, कुशल छायाचित्रकार आणि दुर्गप्रेमीसुद्धा होते.

गो. नी. दांडेकर ह्यांचा जन्म परतवाडा (विदर्भ) येथे झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. वयाच्या १२ व्या वर्षी गोनीदांनी (गो. नी. दांडेकर यांनी) स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी पलायन केले, त्यासाठी त्यांनी सातव्या इयत्तेमध्ये शाळा सोडली. त्यानंतर गोनीदा संत गाडगे महाराजांच्या सहवासात आले. इतकेच नाहीत तर त्यानंतर ते गाडगेमहाराजांचा संदेश पोचवण्यासाठी गावोगाव हिंडले. नंतर गोनीदांनी वेदान्ताचा अभ्यास करणे सुरू केले. पुढे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते बनले. १९४७ मध्ये गोनीदांनी लेखनकार्यावर जीवितार्थ चालविण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी पुढील आयुष्यात कुमारसाहित्य, ललित गद्य, चरित्र, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, धार्मिक, पौराणिक इत्यादी विविध प्रकारचे लेखन केले. त्यांच्या पडघवली आणि शितू ह्या कादंबऱ्या कोकणाचे नयनरम्य चित्र डोळ्यासमोर उभे करतात. त्यांचे दुर्गभ्रमणगाथा हे महाराष्ट्रातील किल्ल्यांवरील प्रवासवर्णन प्रसिद्ध आहे. १ जून १९९८ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांची मुलगी वीणा देव (डॉ.वीणा विजय देव) ह्या प्रसिद्ध लेखिका आहेत. त्यांची नात मधुरा देव हीसुद्धा ललित लेखन करते आणि दुसरी नात मृणाल देव-कुलकर्णी ही विख्यात अभिनेत्री आहे.

गो.नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांच्या वाचनाचा सार्वजनिक कार्यक्रम वर्षातून अनेकदा होतो. या उपक्रमाची सुरुवात १९७५मध्ये प्रत्यक्ष गोनीदांनी केली. संत ज्ञानेश्वरांच्या सातव्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांनी सर्वप्रथम 'मोगरा फुलला' या कादंबरीचे अभिवाचन केले होते. यामध्ये त्यांची कन्या डॉ. वीणा देव, जावई डॉ. विजय देव हे सहभागी झाले होते. कादंबरीतील कथानाट्य वाचनातून लोकांपुढे उभे करण्याच्या या अभिनव प्रयोगाचे त्या वेळी सर्वत्र स्वागत झाले होते. यानंतर गोनीदांच्या कुटुंबीयांनी या अभिवाचनाची एक चळवळच उभी केली. 'मोगरा फुलला'च्या पाठोपाठ मग शितू, पडघवली, मृण्मयी, पवनाकाठचा धोंडी, वाघरू, जैत रे जैत, देवकीनंदन गोपाला, हे तो श्रींची इच्छा अशा एकेक कलाकृती या अभिवाचन संस्कृतीतून वाचकांना भेटू लागल्या. गोनीदा हयात असताना सुरू झालेला हा उपक्रम त्यांच्या पश्चातही या कुटुंबाने अखंडपणे सुरू ठेवला. त्यांच्या या उपक्रमात पुढे देव कुटुंबीयांचे जावई रुचिर कुलकर्णी हेदेखील सहभागी झाले अक्षरधारा बुक गॅलरीतर्फे आयोजित केलेला या कादंबरी अभिवाचनाचा साडेसहाशेवा प्रयोग १८ फेब्रुवारी २०१५ रोजी पुण्यात 'निवारा' सभागृहात झाला..

गो.नी.दांडेकर यांनी पन्नास वर्षे दुर्गभ्रमण केले. या काळात त्यांनी गडाकोटांची, त्यांवरील वास्तूंची असंख्य छायाचित्रे काढली. त्यांपैकी निवडक अशा ११५ कृष्णधवल छायाचित्रांचे एक पुस्तक 'गोनीदांची दुर्गचित्रे' या नावाने प्रकाशित झाले आहे. हे दुर्गप्रेम त्यांनी परोपरीने जागवले. त्यांनी स्वतः जन्मभर दुर्गभ्रमंती केलीच पण 'दुर्गदर्शन', 'दुर्गभ्रमणगाथा' ह्या आपल्या पुस्तकांमधून त्यांनी दुर्गभ्रमंतीचे अनुभव शब्दबद्ध केले. मराठीतील ललित साहित्यात त्यांचे हे लेखन अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या लेखनामुळे हजारो माणसे दुर्गभ्रमंतीकडे आकर्षित झाली. त्यांतल्या अनेकांना गोनीदांनी स्वतः प्रत्यक्ष दुर्गदर्शनही घडवले. 'किल्ले' हे त्यांचे छोटेखानी पुस्तक दुर्गप्रेमींच्या मनात मानाचे स्थान मिळवून आहे. 'पवनाकाठचा धोंडी', 'जैत रे जैत', 'रानभुली', 'त्या तिथे रुखातळी', 'वाघरू', आणि 'माचीवरला बुधा' या त्यांच्या कादंबऱ्यांमधे त्यांनी प्रत्ययकारी दुर्गदर्शन घडवले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्याला मान्सूनपूर्व पावसाने झोडपले !

## वादळामुळे अनेकांची उडाली तारांबळ, अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित, झाडे कोसळली, अकोट तालुक्यात गारपीट

प्रतिनिधी २ जून



**अकोला :** जिल्ह्यातील मूर्तिजापूर, अकोट, तेल्हारा, पातूर तालुक्यातील काही भागात सोमवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी घरावरील टिनपत्रे उडाली. झाडांवरील पक्षी खाली पडले. तर झाडे पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला. त्यामुळे अनेक गावांमध्ये रात्र अंधारात काढण्याची वेळ ग्रामस्थांवर आली.

दिवसभर कडक उन्हाने हैराण केल्यानंतर सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने दिलासा मिळाला.

आकाशात दाट ढग जमल्यानंतर सोसाट्याच्या वाऱ्यासह शहर व काही भागांत मान्सूनपूर्व तुरळक पावसाने हजेरी लावली. सध्या रोहिणी नक्षत्र सुरु असून, ८ जूनपासून मृग नक्षत्राला प्रारंभ होणार आहे. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना उकाड्यातून काहीसा दिलासा मिळाला. दरम्यान, जिल्ह्यात उष्णतेचा तडाखा कायम असून, सोमवारी अकोल्याचे कमाल तापमान ४२.५ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २९.७ अंश सायंकाळी अचानक वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे शहरातील काही भागांमध्ये वीजपुरवठा काही काळ खंडित झाला. त्यामुळे नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली. अनेकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने घर गाठणे पसंत केले, तर लघु उद्योजकांचीही त्रेधातिरपीट उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### तेल्हारा तालुक्यात तुफान वारा व जोरदार पाऊस

तेल्हारा तालुक्यात सुमारे तासभर सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून, केळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हिवरखेड परिसरात जोरदार वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे विविध ठिकाणी वीज तारा तुटल्याच्या घटना घडल्या आहेत. अनेक गावांमध्ये वीजपुरवठा बंद झाला असून काही ठिकाणी झाडेही कोसळली आहेत.

### आलेगावात पक्षी जमिनीवर पडले

आलेगाव परिसरात वाऱ्याचा वेग इतका तीव्र होता की हवेत उडणारे काही पक्षी संतुलन गमावून जमिनीवर पडल्याचे दिसून आले. यामुळे अनेक घरांवरील टिनपत्रे उडाले तर काहींचे सौर ऊर्जाचे प्लेटा उडून दूरवर फेकल्या गेल्या होत्या. यामुळे वीज पुरवठाही खंडित झाला होता. वाऱ्याचा वेग एवढा प्रचंड होता की, आकाशात प्लास्टीकच्या पन्न्या व धूळच धूळ दिसत होती. यामुळे नागरिकांची प्रचंड तारांबळ उडाली.

### पेरणीची घाई नको; घरचे बियाणे वापरा; कृषी विभागाचा सल्ला

अकोला : येत्या खरीप हंगामामध्ये अल-निनो च्या पार्श्वभूमीवर कमी व असमान पावसाचा अंदाज असून मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. १०० मी.मी पाऊस झाल्यानंतरच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. बाजारातील महागडे सोयाबीन बियाणे न वापरता स्वतःजवळील घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी घेऊन बीजप्रकिया करून बियाणे म्हणून वापर करावा. सोयाबीन पिकाची पेरणी रुंद वरंबा व सरी पद्धतीने (बीबीएफ) किंवा बेडवर टोकन पद्धतीने केल्यास बियाण्याची बचत होऊन अधिक उत्पादनाची हमी असते. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

# वादळी वाऱ्याचा अकोट तालुक्याला तडाखा

## फळबागांसह कांदा पिकाचे नुकसान

प्रतिनिधी २ जून



**अकोट :** तालुक्यात सोमवारी (१ जून) सायंकाळी अचानक हवामानात झालेल्या बदलामुळे आलेल्या तीव्र वादळी वाऱ्याने मोठे नुकसान केले. अनेक ठिकाणी महाकाय झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली, तर शेतकऱ्यांच्या फळबागा आणि शेतात काढून ठेवलेल्या कांदा पिकाचेही नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह वातावरणात अचानक बदल झाल्याने नागरिकांची एकच धावपळ उडाली. ग्रामीण भागासह शहरातील अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या. काही ठिकाणी घरांसमोरील आणि रस्त्यालगतची झाडे पडल्याने वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने तत्काळ झाडे हटविण्याचे काम हाती घेतल्याने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

वादळाचा सर्वाधिक फटका वीज यंत्रणेला बसला. अनेक भागांतील वीजवाहिन्यांना धोका निर्माण झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यामुळे नागरिकांना काही काळ अंधाराचा सामना करावा लागला. वीज वितरण कंपनीकडून नुकसानग्रस्त यंत्रणेची पाहणी व दुरुस्तीची कामे सुरू करण्यात आली आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा वादळी वाऱ्यासह पावसाने खराब झाला असून, अनेक फळबागांमधील झाडांचे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. आधीच नैसर्गिक संकटांमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना या वादळामुळे आर्थिक फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महसूल व कृषी विभागाने तातडीने नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून पंचनामे करावेत तसेच बाधित शेतकरी व नागरिकांना शासनाकडून आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

प्रशासनाकडून नुकसानाचा अहवाल समोर आलेला नसला तरी तालुक्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात हानी झाल्याचे चित्र दिसून येत आहे. वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची प्रशासनाकडून पाहणी सुरू असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वादळी वाऱ्याने घरावरील छप्पर गेले उडून

**तेल्हारा :** काल रात्री झालेल्या अवकाळी पाऊस तसेच वाऱ्यामुळे जिल्यात मोठे नुकसान झाले आहे. तेल्हारा तालुक्यातील दहिगांव अवताडे येथील अल्पभूधारक शेतकरी प्रमोद गुणवंत अवताडे यांच्या घरावरील टिनाचे छप्पर लोखंडी अँगलसह उडून गेल्याची घटना घडली असून या घटनेमध्ये त्यांच्या घरातील सर्व वस्तू आणि अन्नधान्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. शासनाने या बाबत तात्काळ दखल घेत पंचनामा करून आर्थिक मोबदला द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यानी केली आहे.



# एचटी बीटी कापसाला परवानगी द्यावी शेतकऱ्यांची मागणी



प्रतिनिधी २ जून

**- मागणी संदर्भात आंदोलनाचा इशारा**
**- जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन**

**अकोला :** तणनाशकाला सहनशील असलेल्या एचटी बीटी (HT Bt) कापूस वाणाला शासनाने तातडीने रीतसर परवानगी द्यावी, तसेच या वाणाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणतीही कारवाई अथवा अडवणूक करू नये, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात अकोट तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

महाराष्ट्र शासनाने कापूस हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) प्रतिक्विंटल १० हजार ५७९ रुपये करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे केली होती. मात्र केंद्र शासनाने कापसाचा एमएसपी केवळ ८ हजार ११० रुपये जाहीर केला. त्यामुळे राज्य शासनाच्या शिफारशीपेक्षा तब्बल २ हजार ४६९ रुपये प्रति क्विंटल कमी भाव शेतकऱ्यांना मिळत आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना मिळणारा दर अपुरा ठरत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत असून विदर्भातील आत्महत्यांचे प्रमाणही चिंताजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एचटी बीटी कापसाच्या लागवडीमुळे तण नियंत्रणासाठी लागणारा खर्च कमी होतो आणि उत्पादन खर्चात बचत होते. त्यामुळे अनेक शेतकरी या वाणाची लागवड करीत आहेत. मात्र शासनाकडून अद्याप या वाणाला अधिकृत परवानगी नसल्याने शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा आणि उत्पादन खर्च कमी करण्यासाठी एचटी बीटी कापूस वाणाला शासनाने त्वरित मान्यता द्यावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली आहे. अन्यथा शेतकऱ्यांना वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या वेळी देण्यात आला आहे.

# कुष्ठरूग्ण शोधमोहिमेला प्रारंभ

**अकोला :** राज्यात सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरुग्ण प्रसाराचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य यंत्रणेतर्फे जिल्ह्यात कुष्ठरूग्ण शोध मोहिमेचा प्रारंभ झाला.

जिल्ह्यातील मागील पाच वर्षांमध्ये एकही कुष्ठरुग्ण आढळून न आलेल्या ५११ गावांमध्ये विशेष घरोघर सर्वेक्षणास सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत एकूण ४ लाख ४ हजार ८६३ लोकसंख्येची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले असून आरोग्य कर्मचारी घरभेटी देत नागरिकांची कुष्ठरोगासंदर्भात तपासणी करीत आहेत. कुष्ठरोगाबाबत जनजागृती करून रोगाची लक्षणे, उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे.

सर्वेक्षणादरम्यान आतापर्यंत ४२८ संशयित रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी ४ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. वेळेत निदान व उपचारामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होत असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रत्येक घरातील सदस्यांची शारीरिक तपासणी करण्यात येत आहे. त्यामुळे लपलेले किंवा निदर्शनास न आलेले रुग्ण शोधून काढण्यास मदत होत आहे

# मान्सूनच्या उंबरठ्यावर 150 कुटुंबे उघड्यावर

प्रतिनिधी २ जून

- पुनर्वसनाविना रेल्वेची कारवाई
- आ. साजिद खान पठाण यांचा आरोप
- आधी पुनर्वसन, मग अतिक्रमण हटवा' अशी मागणी



**अकोला :** शहरातील तारफैल परिसरात गेल्या तीन पिढ्यांपासून वास्तव्यास असलेल्या सुमारे १५० कुटुंबांवर आज पहाटे रेल्वे प्रशासनाने अतिक्रमण हटवण्याची कारवाई केल्यानंतर ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शेकडो नागरिक बेघर झाल्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या कारवाई विरोधात आमदार साजिद खान पठाण यांनी तीव्र आक्षेप नोंदवत, 'पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असताना करण्यात आलेली ही कारवाई केवळ अन्यायकारकच नव्हे तर अमानवी आहे,' असा आरोप केला आहे

या वेळी संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना आमदार साजितखान पठाण यांनी सांगितले की, शहरातील तारफैल परिसरातील जागेच्या मालकी व अतिक्रमण बाबत गेल्या काही महिन्यांपासून प्रशासकीय प्रक्रिया सुरू होती. भूमी अभिलेख विभागाने केलेल्या मोजणी आणि सीमांकनात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या कुटुंबांची घरे बाधित क्षेत्रात आली होती. त्यानंतर प्रभावित नागरिकांच्या वतीने त्यांनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी, भूमी अभिलेख विभाग आणि रेल्वे प्रशासनाशी अनेक स्तरांवर चर्चा केली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार, अतिक्रमण हटवण्यापूर्वी पर्यायी जागा उपलब्ध करून देणे आणि पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करणे ही किमान प्रशासनाची जबाबदारी होती. या संदर्भात पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे तसेच जिल्हाधिकाऱ्यांनीही पुनर्वसनाचा विषय गांभीर्याने विचारात घेण्याचे आश्वासन दिल्याचा दावा त्यांनी केला. मात्र प्रत्यक्षात पुनर्वसनाचा प्रश्न निकाली निघण्यापूर्वीच पहाटेच्या सुमारास पोलीस बंदोबस्तात कारवाई सुरू करण्यात आली असून हा त्या कुटुंबीयांवर झालेला फार मोठा अन्याय आहे, असा आरोप आमदार साजितखान पठाण यांनी यावेळी केला आहे.

# पुढील वर्षापर्यंत विद्यार्थी पाठशाळा सभागृहाच्या बांधकामाची पूर्णाहुती - आ. भारसाकळे

प्रतिनिधी २ जून



**विद्यार्थ्यांची ऊर्जा प्रेरणादायी, सर्वांगीण विकासाचे स्तुत्य प्रात्यक्षिक**

**अकोट :** श्री संत वासुदेव महाराज सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकातून बघायला मिळालेली ज्ञान संपादनूक अतिशय आनंद देणारी व अभिनंदनीय आहे. हे विद्यार्थी म्हणजे देशाचं उज्वल भविष्य आहेत. या विद्यार्थ्यांच्या निवासाकरिता गतवर्षी भूमिपूजन झालेल्या विद्यार्थी पाठशाळेच्या वास्तूची उभारणी पुढील वर्षापर्यंत निश्चित पूर्णत्वास जाईल, असे अभिवचन आमदार प्रकाश भारसाकळे यांनी यावेळी व्यक्त केले.

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट द्वारा आयोजित श्री क्षेत्र श्रद्धासागर येथील बालसंस्कार शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. संस्कार रुजविण्याचे आणि संस्कृती रक्षणाचे काम या बालसंस्कार शिबिरातूनच घडते. सद्गुरु श्री संत वासुदेव महाराजांच्या विचाराची धुरा श्री संस्था सांभळत आहे, याबाबत उपस्थितांनी गौरवोद्गार काढले. समारोपाकरिता सुभाष म. काळे, साहेबराव पखान, गजानन नारे, सचिन बुरघाटे, डॉ. दिलीप काळे, राजेश नागमते, ज्ञानेशप्रसाद म. पाटील, अतुल म.बोर्डे, विवेक कांबे, अजाब वहिले, सागर म. परिहार, विष्णु म. गावंडे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच श्री संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे बाबाराव बिहाडे, महादेव ठाकरे, पुरुषोत्तम लाजूरकर, रवींद्र वानखडे, मोहन जायले, अविनाश गावंडे, डॉ. अशोक बिहाडे, जयदीप सोनखासकर, अशोक पाचडे, नंदकिशोर हिंगणकर, ॲड शिरीष ढवळे, पुरुषोत्तम मोहोकार, अनिल कोरपे, गजाननराव दुधाट, केशवप्रसाद राठी, त्याचप्रमाणे प्रा. साहेबराव मंगळे, मधुकरराव पुंडकर, जयकृष्ण वाकोडे, प्रकाशराव साबळे, महेंद्र शेलकर, सुरेंद्र चिकटे, अनिल गोंडचर, राजेश कुलट, अमोल डोंगरे यांसह अध्यापक मंडळी तथा बहुसंख्येने पालक वर्ग उपस्थित होता.

# हिवरखेड बसस्थानकांवर एस टी बसचा वर्धापन दिन साजरा

प्रतिनिधी २ जून



**हिवरखेड :** येथील एस टी बसस्थानकावर महामंडळच्या एस टी बस चा वर्धापन दिन साजरा करण्यात आला ,या परिसरात केळीच्या पानांनी सजावट करण्यात आली रांगोळी, आंब्याच्या पाने व तोरणे बांधून या बसस्थानक परिसराला सन उत्सवाचे जणू स्वरूप आले, पहिली बस ही १, जून १९४८ ला पुणे, नगर मार्गावर धावली होती,त्या काळी २ रुपये ५०पैसे एवढेच भाडे या अंतरावर होते, बसचा प्रवास प्रवाशांनसाठी नेहमी लाभदायक असतो अशी माहिती सुद्धा यावेळी देण्यात आली यावेळी हिवरखेड बसस्थांक पॉईंट कंट्रोलर सुप्रिया इंगळे, बस चालक वालसिंगे, वाहक संजय मोरखडे, उपस्थित नागरिक उमेश इंगळे अर्जुन खिरोडकार यांनी एसटी बसला हार फुले अर्पण केले व प्रवाशांचा प्रत्येक प्रवास सुखाचा जावो अशी प्रार्थना करुन हा ७८ वा वर्धापन दिन साजरा केला.

# अकोल्यात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

## गेल्या वर्षभरात तब्बल २२ लाखांचा अन्नपदार्थ साठा जप्त!

- ✦ एफडीएची प्रतिबंधित मालावर धडक कारवाई
- ✦ अन्नसुरक्षा अधिकारी आर. डी. सोळंके यांचा मोठा खुलासा

प्रतिनिधी २ जून

**अकोला :** अन्न आणि औषध प्रशासनाने अन्नपदार्थांमधील भेसळ आणि प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्री करणाऱ्यांविरोधात गेल्या वर्षभरात मोठी मोहीम उघडली आहे. अन्नसुरक्षा अधिकारी आर. डी. सोळंके यांनी 'आर आर सी'शी विशेष बातचीत करताना या धडक कारवाईचा संपूर्ण लेखाजोखा मांडला आहे. गेल्या वर्षभरात लाखो रुपयांचा असुरक्षित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला असून, अनेक व्यापाऱ्यांवर फौजदारी गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. पाहूयात या कारवाईचा हा सविस्तर अहवाल...'

अन्न आणि औषध प्रशासनाने गेल्या वर्षभरात म्हणजेच एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत अत्यंत कडक पावले उचलली आहेत. अन्नसुरक्षा अधिकारी आर. डी. सोळंके यांनी दिलेल्या माहितीनुसार, या काळात तपासणीसाठी एकूण १५२ अन्न नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी १२२ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले असून, ४ नमुने अत्यंत 'असुरक्षित' तर २ नमुने 'कमी दर्जाचे' आढळून आले आहेत. याप्रकरणी न्यायालयात ४ खटले दाखल करण्यात आले आहेत. या वर्षभरात अन्नपदार्थ जप्तीची एकूण १० प्रकरणे समोर आली. यामध्ये लूज ऑईल, चहापत्ती, मैदा, टोस्ट आणि टूटी-फ्रूटी यांसारख्या पदार्थांचा समावेश होता. प्रशासनाने एकूण २२ लाख १५ हजार ८८४ रुपयांचा हा भेसळयुक्त माल जप्त केला आहे.

फक्त अन्नपदार्थच नव्हे, तर प्रतिबंधित मालाची विक्री करणाऱ्यांवरही प्रशासनाने कडक बडगा उगारला. वर्षभरात ११ ठिकाणी छापे मारून ११ लाख ६२ हजार ८९५ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. यात ४ लाख ४० हजार रुपये किमतीची ३ वाहनेही जप्त करण्यात आली असून, ११ जणांवर एफआयआर (FIR) दाखल करण्यात आली आहे. तसेच तडजोड प्रकरणांमध्ये व्यापाऱ्यांकडून १ लाख ५१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून, पुढील न्यायनिर्णयासाठी अमरावती सहआयुक्तांकडे ४ खटले दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, ही मोहीम यावर्षीही अशीच सुरू आहे. चालू वर्षात आतापर्यंत २८ अन्न नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. अन्नपदार्थ जप्तीचे १ प्रकरण समोर आले असून, २२ हजार ५०० रुपयांचा माल जप्त केला आहे. तर प्रतिबंधित मालाची ९ प्रकरणे उघडकीस आणून, ३ लाख २५ हजार ५३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी ९ जणांवर एफआयआर दाखल करण्यात आली असून, ३ लाख रुपये किमतीची ३ वाहने जप्त करून न्यायालयात ३ खटले दाखल करण्यात आले आहेत. अन्नपदार्थांत भेसळ करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशाराच या कारवाईतून प्रशासनाने दिला आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## बाभूळगाव, आर्णीत सोमवारी पाऊस, वातावरणात गारवा

प्रतिनिधी २ जून

**यवतमाळ :** नवतपा सुरू असतानाच वादळी पावसाचे आगमन होत आहे. रविवारी केळापूर, आर्णी, कळंब, राळेगाव या परिसरात जोरदार वादळ होऊन पाऊस बरसला होता. त्यामुळे तापमानात मोठी घट झाली आहे.

तीव्र उन्हापासून दिलासा मिळाला आहे. सोमवारी सायंकाळीसुद्धा पावसाने हजेरी लावली. आर्णी व बाभूळगाव तालुक्यात धुवाधार पाऊस बरसला.

वादळामुळे अनेक भागात मोठे नुकसान झाले आहे. २४ तास लोटूनही अनेक गावातील वीजपुरवठा खंडित झाला आहे.

त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तेथील ग्रामस्थांना भेडसावत आहे. वीज कंपनीकडून पुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पुढील काही दिवस ढगाळी वातावरण व वादळी पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे. मान्सून कधी धडकतो, याची सर्वांनाच प्रतीक्षा लागली आहे.

# विधानपरिषद निवडणुक : महायुतीत फूट, महाविकास आघाडीत एकजुट

## शिवसेनेचे चतुर्वेदी, भाजपाचे भुतडा तर कॉंग्रेसचे कांबळे यांचे नामांकन दाखल










प्रतिनिधी २ जून

**यवतमाळ :** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यात राजकीय घुसळण वाढली आहे. महायुतीत उघड बिघाड दिसून येत असताना महाविकास आघाडीने पूर्ण एकजुटीचे प्रदर्शन केल्याने या निवडणुकीत चुरशीची लढत अपेक्षित आहे.

महायुतीचे अधिकृत उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांनी नामांकन अर्ज दाखल केला. मात्र, अर्ज सादर करताना भाजप व राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) यांचे मंत्री, आमदार आणि प्रमुख नेते अनुपस्थित राहिले. या गैरहजेरीमुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद समोर आले आहेत.

यात आणखी भर पडली ती भाजपचे नेते नितीन भुतडा यांनी स्वतंत्रपणे उमेदवारी अर्ज दाखल करून. समर्थकांसह भुतडा यांनी केलेल्या या शक्तिप्रदर्शनामुळे महायुतीतील गटबाजी आणि नाराजीची चर्चा अधिक तीव्र झाली आहे. बाहेरून 'एकजूट' दाखवली जात असली तरी आतून 'सर्व काही ठीक नाही' असे चित्र निर्माण झाले आहे.

महाविकास आघाडीचे एकजुटीचे शक्तिप्रदर्शन

दुसरीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी नामांकन अर्ज दाखल करताना एकतेचे जोरदार दर्शन घडविले. यवतमाळ येथील हिरा पॅलेस सभागृहात झालेल्या बैठकीत महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष, मित्रपक्ष आणि अपक्ष नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कांबळे यांच्या विजयासाठी एकदिलाने काम करण्याचा ठराव करण्यात आला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांची एकत्रित उपस्थिती आणि कार्यकर्त्यांमधील उत्साह पाहता आघाडीच्या गोटात सकारात्मक वातावरण आहे. निवडणुकीपूर्वीच एकसंघतेचा संदेश देण्यात महाविकास आघाडी यशस्वी ठरली आहे.

### पाच उमेदवारांचे नामांकन

महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी यवतमाळ मतदारसंघातून पाच उमेदवारांनी एकूण दहा नामांकन अर्ज दाखल केले आहेत. आतापर्यंत ५५ अर्जांची उचल झाल्याची माहिती समोर आली आहे.

नामांकन दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये साहेबराव दत्तराव कांबळे (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस), दुष्यंत सतीश चतुर्वेदी (शिवसेना), नितीन सुरेशचंद्र भुतडा (भारतीय जनता पक्ष), सय्यद फारुक सय्यद करीम (अपक्ष) आणि साजिद बेग हाफिज बेग मिर्झा (अपक्ष) यांचा समावेश आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार, नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. अर्जांची छाननी उद्या (२ जून) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून रोजी आहे. स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत घेण्यात येणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे.

### मतविभाजनाचा फायदा कुणाला?

■ महायुतीतील अंतर्गत कलह आणि महाविकास आघाडीची दिसणारी एकजूट पाहता, या निवडणुकीत महाविकास आघाडीला फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महायुतीतील नाराजीमुळे मतांचे विभाजन झाल्यास महाविकास आघाडी मजबूत होईल का, की शेवटच्या टप्प्यात महायुती एकत्र येऊन आपली ताकद दाखवेल, याकडे जिल्ह्यातील राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील ही विधान परिषद लढत केवळ जागेसाठी नसून, दोन्ही आघाड्यांच्या संघटनात्मक बळाची परीक्षा ठरणार आहे.

## दिग्रस पोलीस ठाण्याला कायमस्वरूपी निरीक्षक

### वैजनाथ मुंडे यांनी स्वीकारला पदभार

प्रतिनिधी २ जून

**दिग्रस :** गेल्या तीन महिन्यांपासून प्रभारी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या दिग्रस पोलीस ठाण्याला अखेर कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक मिळाले आहेत. वैजनाथ मुंडे यांनी ३१ मे रोजी पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारला असून त्यांच्या पुनरागमनामुळे पोलीस प्रशासनात स्थैर्य येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

तत्कालीन पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांच्या बदलीनंतर वैजनाथ मुंडे यांनी दिग्रस पोलीस ठाण्याची सूत्रे स्वीकारली होती. मात्र, नंतर झालेल्या प्रशासकीय बदलांमुळे त्यांची बदली करण्यात आली.



त्यानंतर सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी डॉ. तेजस सारडा यांच्याकडे पोलीस ठाण्याचा कारभार सोपविण्यात आला होता.

डॉ. सारडा यांनी तीन महिन्यांच्या कालावधीत पोलीस ठाण्याचे कामकाज सांभाळताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवल्या. शांतता समितीच्या बैठका, जनजागृती मोहिमा तसेच नागरिकांशी संवाद साधण्यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे पोलीस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास कायम राहिला.

दरम्यान, ३१ मे रोजीच्या प्रशासकीय आदेशानुसार वैजनाथ मुंडे यांनी पुन्हा पदभार स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली गुन्हेगारी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, महिला सुरक्षा, नागरिकांच्या तक्रारींचे तत्पर निवारण आणि लोकाभिमुख पोलीसिंगला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मुंडे यांच्या पुनरागमनाचे शहरातील व्यापारी संघटना, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांनी स्वागत केले आहे. पोलीस प्रशासनाला स्थैर्य मिळाल्याने ठाण्याचे कामकाज अधिक प्रभावी आणि गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

तीन महिन्यांनंतर पुन्हा एकदा वैजनाथ मुंडे यांच्या हाती दिग्रस पोलीस ठाण्याची सूत्रे आल्याने कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत होण्याबरोबरच नागरिकांच्या अपेक्षांनाही नवे बळ मिळाले आहे.

## अवैध गावठी दारु भट्ट्यांवर छापा; ८७ रुपयांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २ जून

**महागाव :** यवतमाळ जिल्ह्यातील काळी दौलतखान परिसरात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई करत अवैध गावठी हातभट्टी दारूच्या तीन भट्ट्या उद्ध्वस्त केल्या. या कारवाईत १२० लिटर तयार गावठी दारू व २,१६० लिटर मोहामास सडवा जप्त करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ८७,६०० रुपये आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या १२० लिटर तयार दारूची किंमत १२,००० रुपये तर २,१६० लिटर मोहामास सडव्याची किंमत ७५,६०० रुपये इतकी आहे. या भट्ट्यांमध्ये दारू उत्पादनासाठी वापरण्यात येणारे साहित्यही नष्ट करण्यात आले.

ही कारवाई अमोल मोहन राठोड, जयसिंग विजय राठोड आणि रामभाऊ हलपुंडे यांच्या ठिकाणी सुरू असलेल्या अवैध भट्ट्यांवर करण्यात आली.

यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई पार पाडली.

अवैध दारू उत्पादन व विक्री रोखण्यासाठी पोलिसांकडून अशा कारवाया सातत्याने करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. नागरिकांनी अवैध दारू निर्मितीविषयी माहिती असल्यास पोलिसांना कळवावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.



## यवतमाळ फार्मर ग्रुप लीग; आधुनिक शेतीला चालना देणारी अनोखी स्पर्धा

प्रतिनिधी २ जून

**यवतमाळ :** जिल्ह्यातील शेतकरी गटांमध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, समूह शेतीची संकल्पना आणि कमी खर्चात प्रभावी पीक व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'यवतमाळ फार्मर ग्रुप लीग' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विविध कृषी उपक्रमांच्या अंमलबजावणीवर आधारित गुणांकन पद्धतीमुळे ही स्पर्धा शेतकऱ्यांसाठी आकर्षण ठरत आहे.

स्पर्धेच्या निकषांनुसार बायोडायनॅमिक कंपोस्ट निर्मिती करणाऱ्या शेतकरी गटांना दोन गुण दिले जाणार आहेत. प्रत्यक्ष कीड व रोग नियंत्रणांतर्गत हुमा अळी नियंत्रण मोहीम, ट्रायकोकार्ड, फेरोमन ट्रॅप्स, चिकट सापळे आणि पक्षी थांबे या प्रत्येक घटकासाठी एक गुण मिळणार आहे. स्पर्धेचा चौथा टप्पा विशेष महत्त्वाचा मानला जात असून, प्रसार क्षमता बांधणी आणि नेतृत्व विकासावर भर देण्यात आला आहे. शेतीशाळेतील सहभागासाठी एक गुण, जलतारा शेत शोषखड्डा निर्मितीसाठी दोन गुण दिले जाणार आहेत. तसेच शिवार फेरी, कार्यशाळा किंवा गावाबाहेर मार्गदर्शन करणाऱ्या गटांना प्रत्येक कार्यक्रमासाठी पाच गुण मिळतील. महाविस्तार ॲपचा वापर करणाऱ्या तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण प्रयोग आणि यशोगाथांचा प्रसार करणाऱ्या शेतकरी गटांना अतिरिक्त १० गुणांचा 'मेगा बोनस' दिला जाणार आहे. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करणाऱ्या गटांना स्पर्धेत आघाडी घेण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेसाठी नोंदणी प्रक्रिया २६ मेपासून सुरू झाली असून १० जूनपर्यंत सुरू राहणार आहे. इच्छुक शेतकरी गटांना गुगल फॉर्मद्वारे किंवा संबंधित गावातील सहायक कृषी अधिकाऱ्यांकडे नोंदणी करता येणार आहे. "यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी प्रगतिशील असून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीत सातत्याने सुधारणा करीत आहेत. जिल्ह्यात प्रथमच 'यवतमाळ फार्मर ग्रुप लीग' राबविण्यात येत आहे. या स्पर्धेमुळे समूह शेती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि कमी खर्चात प्रभावी पीक व्यवस्थापनाला चालना मिळेल.

### सहभागासाठी आवश्यक अटी

■ स्पर्धेच्या नियमांनुसार प्रत्येक गावातून किमान एक शेतकरी गटाचा सहभाग अनिवार्य आहे. प्रत्येक गटामध्ये किमान १० आणि कमाल २० सदस्य असणे आवश्यक आहे.

## आमनीत घरकुल विक्रीचा आरोप; ग्रामपंचायतीकडून दाव्याचे खंडन

प्रतिनिधी २ जून

**आर्णी :** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलाच्या कथित विक्रीप्रकरणी आमनी गावात वाद निर्माण झाला आहे. एका नागरिकाने जिल्हाधिकारी व गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली असून, ग्रामपंचायतीने मात्र हे आरोप फेटाळून लावले आहेत.

मनोहर पवार, रा. आमनी यांनी प्रशासनाकडे दिलेल्या तक्रारीत सदर इसम ग्रामपंचायत तेंडोळी येथे शिपाई पदावर कार्यरत असून त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत मिळालेल्या घरकुलाचा लाभ घेतला. मात्र घरकुलाचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच त्याची विक्री करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत ग्रामपंचायत तेंडोळीचे ग्रामसेवक एम. बी. गौरकार यांनी वेगळे मत व्यक्त केले आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे घरकुलाची कोणतीही विक्री झालेली नसून, त्याबाबत ग्रामपंचायतीकडे कोणतीही अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणामुळे गावात चर्चा रंगली असून, तक्रारीतील आरोप आणि ग्रामपंचायतीची भूमिका यामुळे सत्यस्थिती काय आहे, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रशासनाकडून चौकशी झाल्यानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येणार आहे.

## खांद्यावर पक्षाचा झेंडा; सत्तेत मात्र दुय्यम स्थान

प्रतिनिधी २ जून

समीर शिंदे

**बाभूळगाव :** निवडणुकीच्या काळात पक्षासाठी रात्रंदिवस झटणारे, सभा-मेळाव्यांची जबाबदारी सांभाळणारे आणि गावोगाव पक्षाचा प्रचार करणारे कार्यकर्ते सत्तेची फळे वाटण्याची वेळ आली की मागे पडत असल्याची भावना तळागाळात व्यक्त होत आहे. अनेक वर्षे पक्षनिष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना निर्णयप्रक्रिया व पदवाटपात योग्य स्थान मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे.

राजकीय पक्षांची ताकद कार्यकर्त्यांवर उभी असते. निवडणुकीच्या काळात कार्यकर्त्यांचा शोध घेतला जातो, त्यांच्यावर विविध जबाबदाऱ्या सोपवल्या जातात. मात्र निवडणूक संपल्यानंतर आणि सत्तेची समीकरणे जुळू लागल्यानंतर त्याच कार्यकर्त्यांना दुय्यम वागणूक मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

अनेक कार्यकर्त्यांनी पक्षासाठी आपले शिक्षण, व्यवसाय आणि वैयक्तिक आयुष्य बाजूला ठेवून काम केले. काहींनी रोजगाराच्या संधी गमावल्या, तर काहींनी आर्थिक अडचणींचा सामना केला. मात्र सत्तेतील पदे, समित्या किंवा महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमध्ये आर्थिक बळ, राजकीय वारसा किंवा प्रभाव असलेल्या व्यक्तींनाच संधी मिळत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, कार्यकर्त्यांमधील वाढती अस्वस्थता ही पक्षांसाठी चिंतेची बाब ठरू शकते. कारण संघटनात्मक बळ टिकवून ठेवण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांचा सहभाग आणि सन्मान महत्त्वाचा असतो. कार्यकर्त्यांच्या अपेक्षा आणि योगदानाकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचा परिणाम भविष्यातील निवडणुकांवरही होऊ शकतो.

दरम्यान, निष्ठावान कार्यकर्त्यांना संघटनेत योग्य प्रतिनिधित्व आणि संधी देण्याची मागणी पुढे येत आहे. पक्षासाठी वर्षानुवर्षे काम करणाऱ्यांना केवळ प्रचारापुरते मर्यादित न ठेवता नेतृत्वाच्या प्रवाहात स्थान देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### 'काम आमचे, मान दुसऱ्यांचा'

■ निवडणुकीत पक्षासाठी जीवाचे रान करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात हा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहे. सत्तेच्या केंद्रस्थानी पोहोचताना निष्ठावंत कार्यकर्त्यांना कितपत न्याय मिळतो, यावरच संघटनांचे भवितव्य अवलंबून राहणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## तर मंत्री-आमदारांच्या घरांसमोर आंदोलन

### शेतकऱ्यांचा 'जवाब दो' आंदोलनातून इशारा

प्रतिनिधी २ जून

**उमरखेड :** अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची विमा भरपाई अद्याप न मिळणे, उसाची थकीत बिले आणि खरीप हंगामाच्या तोंडावर खत, बियाणे व कीटकनाशकांच्या कथित काळाबाजाराविरोधात शेतकऱ्यांनी सोमवारी उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर 'जवाब दो' आंदोलन केले. भर उन्हात ठिय्या आंदोलन करत शेतकऱ्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

शेतकरी प्रतिनिधींनी सांगितले की, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले होते. प्रशासनाने पंचनामे करून नुकसानाची नोंद घेतली असतानाही अनेक शेतकऱ्यांना अद्याप विमा रक्कम मिळालेली नाही. यवतमाळसारख्या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत असताना विमा कंपन्यांकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

आंदोलनादरम्यान शेतकरी नेत्यांनी लोकप्रतिनिधींवरही टीका केली. पावसाळ्यात शेतभेटी आणि छायाचित्रांपुरतेच प्रश्न मर्यादित राहतात, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळत नसल्याचे त्यांनी म्हटले. उसाची बिले गेल्या तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांकडे खरीप हंगामासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध नसल्याची बाबही आंदोलकांनी मांडली.



शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात विमा दाव्यांची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, तसेच खत, बियाणे व कीटकनाशकांच्या काळाबाजारावर नियंत्रण ठेवून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी केली. पुढील आठ दिवसांत मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्यास जिल्ह्यातील मंत्री व आमदारांच्या निवासस्थानांसमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

दरम्यान, आंदोलनाची पूर्वकल्पना असूनही उपविभागीय अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. प्रशासनाच्या या भूमिकेचा आंदोलकांनी निषेध केला.

या आंदोलनात पंडागळे, बळीराम चव्हाण, आदित्य काळे, डॉ. घोडेकर, सुरेश कदम, सरोज देशमुख, निवृत्ती पाटील वानखेडे, दिनेश रावते, दत्तराव शिंदे, राजू जयस्वाल, बबलू जाधव वानखेडे, स्वप्निल कनवाळे, विवेक वानखेडे यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

## मुख्य जलवाहिनीला गळती; दिग्रसचा पाणीपुरवठा तीन दिवस ठप्प

प्रतिनिधी २ जून

**दिग्रस :** शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा फटका बसला असून मुख्य जलवाहिनीला गंभीर गळती लागल्याने पुढील तीन दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय नगरपालिकेला घ्यावा लागला आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून आवश्यक साठा करून ठेवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या माहितीनुसार, धरणातील फिल्टर हाऊसपासून पशुवैद्यकीय दवाखान्याजवळील जलकुंभापर्यंत पाणी पोहोचविणाऱ्या मुख्य एम.एस. जलवाहिनीला मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. परिणामी, टाकीकडे जाणाऱ्या पाण्याचा दाब कमी झाला असून जलकुंभ भरण्याची प्रक्रिया ठप्प झाली आहे. पाणीपुरवठा अभियंता मनोज कुडमेथे यांनी सांगितले की, संबंधित जलवाहिनी सुमारे दहा वर्षांपूर्वी टाकण्यात आली होती. काही दिवसांपासून किरकोळ गळती सुरू होती; मात्र अलीकडे ती वाढल्याने परिस्थिती गंभीर बनली. प्राथमिक पाहणीत गळतीमुळे सुमारे ३० ते ३५ टक्के पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे. गळतीचे ठिकाण दलदलीच्या भागात असल्याने दुरुस्तीचे काम आव्हानात्मक ठरत आहे. जेसीबी आणि विशेष पंपांच्या साहाय्याने साचलेले पाणी उपसण्याचे काम सुरू असून दलदल कमी झाल्यानंतर जलवाहिनीचे वेल्डिंग करून गळती बंद करण्यात येणार आहे. या कामासाठी नागपूर येथील तज्ज्ञ तंत्रज्ञांचे मार्गदर्शन घेतले जात असून नगरपालिकेचे कर्मचारी आणि तांत्रिक पथक घटनास्थळी कार्यरत आहे. पाणीपुरवठा शक्य तितक्या लवकर पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. दरम्यान, पुढील तीन दिवस पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा जपून वापर करावा, अनावश्यक वापर टाळावा आणि आवश्यकतेनुसार साठा करून ठेवावा, असे आवाहन नगरपालिकेने केले आहे. दुरुस्तीच्या कामाकडे शहरवासीयांचे लक्ष लागले.

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. २ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## माजी सैनिक व वीरपत्नींच्या पाल्यांना ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, वीरपत्नी आणि त्यांच्या पाल्यांसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार केंद्रीय सैनिक बोर्डाची (केएसबी) अधिकृत ऑनलाईन संकेतस्थळ प्रणाली सुरू झाली आहे. पात्र माजी सैनिक आणि वीरपत्नींच्या पाल्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे शैक्षणिक साहाय्य मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इयत्ता पहिली ते बारावी तसेच बीए, बी.कॉम आणि बी.एस्सी या पदवी अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यांचे अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आहे. सर्व पात्र माजी सैनिक आणि विधवा भगिनींनी आपल्या पाल्यांचे ऑनलाईन फॉर्म विहित मुदतीत भरावेत आणि फॉर्म भरून झाल्यानंतर त्याची प्रिंट व संकेतस्थळावर अपलोड केलेली सर्व संबंधित कागदपत्रे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# शिवपरिवारातील अमृत महोत्सवी सोहळा थाटात

**♦माजी न्या. भूषण गवई; ना. नितीन गडकरी, ना. पंकज भोयर यांची उपस्थिती ♦ हर्षवर्धन देशमुख यांचा सपत्निक सत्कार करून. ना. नितिन गडकरी व भुषण गवई यांच्या हस्ते त्यांना मानपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले**

प्रतिनिधी २ जून

**अमरावती :** श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा रविवारी येथे दिमाखदार वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांची मोठी उपस्थिती लाभली होती.

अध्यक्षस्थानी माजी सरन्यायाधीश भूषण गवई होते, तर विशेष अतिथी म्हणून ना. नितीन गडकरी, ना. डॉ. पंकज भोयर, महापौर श्रीचंद तेजवाणी उपस्थित होते. व्यासपीठावर हर्षवर्धन देशमुख व त्यांच्या पत्नी निर्मला देशमुख, दिलीप इंगोले यांच्यासह खा. बळवंत वानखडे, आ. सुलभा खोडके, आ. संजय खोडके, आ. किरण सरनाईक, आ. प्रताप अडसड, आ. रवी राणा, आ. प्रवीण तायडे यांच्यासह माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील, अनंत गुढे, वसंत खोटरे, गुलाबराव गावंडे, प्रीती बंड, सुरेखा ठाकरे, विलास इंगोले, नरेश पाटील, भैयासाहेब मेटकर आदी.



**गौरव ग्रंथाचे प्रकाशन आणि जीवनपट**

कार्यक्रमाची सुरुवात करताना शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ यांनी प्रास्ताविकातून दोन्ही सत्कारमूर्तींच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. या सोहळ्याचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते 'गौरव ग्रंथा'चे विमोचन करण्यात आले. यानंतर मानपत्राचे वाचन करण्यात आले.

**मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव**

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मुख्य अतिथींच्या हस्ते भैयासाहेब देशमुख, त्यांच्या पत्नी निर्मला देशमुख आणि दिलीप इंगोले यांना मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. अप्रतिम लेझर शोने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

**डॉ. पंजाबराव देशमुखांच्या नावे भव्य शैक्षणिक संकुल : राज्यमंत्री पंकज भोयर**

देशाचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या नावाने अमरावती येथे एक भव्य व अद्ययावत 'शैक्षणिक संकुल' साकारले जाणार आहे. या संकुलामध्ये विभागातील सर्व प्रमुख शैक्षणिक कार्यालये एकाच छताखाली आणली जाणार असून, विभागासाठी ही अत्यंत आनंदाची बाब आहे. राज्य सरकारने आपल्या चालू अर्थसंकल्पात (बजेटमध्ये) या प्रकल्पासाठी विशेष आर्थिक तरतूद केली असल्याची महत्त्वाची माहिती राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन (भैयासाहेब) देशमुख आणि कोषाध्यक्ष दिलीप इंगोले यांच्या अमृत महो सवी सोहळयात विशेष अतिथी उपस्थिती होती. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एडवोकेट गजानन फुंडकर, कार्यकारणी सदस्य केशवराव गावंडे तुमच्या सर्व कार्यकारी सदस्य उपस्थित होते.

## वयोवृध्द इसमास लुटणारा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २ जून

**अमरावती :** वयोवुध्द इसमास लुटणारा गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांचे कडुन जेरबंद केला. मनिष अनिल जोशी वय ३३ वर्ष रा. पार्वती नगर अमरावती ह.मु. यश कॉलनी टॉवर लाईन, असे आरोपीचे नाव आहे.

पो.स्टे. वरुड येथे तक्रारदार गणपत चिरकुटराव बांबल वय ७३ वर्ष रा. गाडेगाव ता. वरुड जि. अमरवती यांनी तक्रार दिली कि, ते दिनांक २६/०५/२०२६ रोजी सकाळी ०९-०० वा दरम्यान शेती करीता खत विकत घेण्याकरीता राजुरा बाजार येथे आले असता त्यांचे जवळ एक चेहऱ्यावर दुप्पटा बाधंलेला इसम मोटर सायकल घेवुन जवळ आला व त्यांना वडील दवाखाण्यात भरती आहे असे खोटे सांगुन गाडीवर बसुन राजुरा बाजार शाळेजवळ नेले तेथे गेल्यावर त्याने तक्रारदार यांना चिल्लर पैसे मागीतले म्हणुन तक्रारदार यांनी स्वतः जवळील खिशातील पाकिट मध्ये खत खरेदी आणलेले १०,०००/- रुपये बाहेर काढले तर आरोपीने तक्रारदार यांचे हातातील पुर्ण पैसे एकुण १०,०००/- रुपये हिसकावुन घेतले व मोटर सायकल चालु करुन वरुड कडे पळुन गेला. अशा तक्रारदार यांनी पो.स्टे. वरुड येथे तक्रार दिल्याने पो.स्टे. वरुड येथे अप.क्रं, ३०४/२०२६ कलम ३०४(२) भा.न्या.स चा नोंदकरण्यात आला होता. सदरची



कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने अप्पर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे स्थानिक गुन्हे शाखा अमरावती (ग्रामीण) यांचे नेतृत्वात पोलीस उप निरीक्षक नितीन इंगोले, मोहन मोरे, पो.हे.कॉ. पुरुषोत्तम यादव, सैय्यद अजमत, स्वप्निल तंवर, चेतन दुबे, नितीन वानखडे सरजिप चालक पो.हे.कॉ. नईम कासम शहा व तांत्रिक मदत सायबर पो.स्टे.चे अमंलदार रितेश गोसामी, रुपाली इंगोले यांनी केली.

## गावठी पिस्तूल, २ जिवंत काडतुसे आणि २ धारदार तलवारींसह ३ आरोपींना अटक

प्रतिनिधी २ जून

**अंजनगाव सुर्जी :** शहरात शस्त्रांसह फिरून एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या तीन आरोपींना अंजनगाव सुर्जी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून शिताफीने अटक केली आहे. या कारवाईत आरोपींकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल (गावठी कट्टा), दोन जिवंत काडतुसे, दोन धारदार तलवारी आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, तीन मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१ जून रोजी अंजनगाव पोलीस स्टेशन ला गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली की, पिस्ता रंगाच्या सुझुकी ॲक्सेस मोपेडवर तीन तरुण अग्निशस्त्रांसह शहरात संशयास्पदरीत्या फिरत

**अंजनगाव सुर्जी पोलिसांची धडक कारवाई**



आहे.

या माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकारी निकेतन कदम (पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण), दत्ता तोटेवाड(अप्पर पोलीस अधीक्षक) , मनीष ठाकरे (उपविभागीय पोलीस अधिकारी, अंजनगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांनी डी.बी. पथकाची (गुन्हे शोध पथक) नियुक्ती करण्यात आली. पोलिसांनी परतवाडा रोडवरील हॉटेल पद्मश्री जवळ सापळा रचला. काही वेळातच मिळालेल्या वर्णनाची मोपेड तिथून जाताना दिसली. दोन पंचांसमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे बेकायदेशीर शस्त्रे आढळून आली.

वंश दिपक साहु (वय २० वर्षे, रा. शनिवारा, अंजनगाव सुर्जी): याच्या अंगझडतीत कमरेला खोचलेले १ देशी बनावटीचे पिस्तूल आणि २ जिवंत काडतुसे मिळून आली. (अंदाजे किंमतः २०,६००/- रुपये). अनिल मदन सोळंके (वय २३ वर्षे, रा. विलास नगर, लोहार लाईन, अमरावती): व मोबाईल ५०००/- याच्या पाठीमागे शर्टच्या आत लपवून ठेवलेली १ धारदार लोखंडी तलवार जप्त करण्यात आली.

अल्केश दिपक पवार (वय २१ वर्षे, रा. आठवडी बाजार, परतवाडा): थ्याच्याकडेही शर्टच्या आत लपवून ठेवलेली १ धारदार लोखंडी तलवार (एकूण लांबी १९ इंच) मिळून आली. आयफोन मोबाइल ४५०००/- तसेच, गुन्ह्यात वापरलेली सुझुकी ॲक्सेस मोपेड (Mh 27 EA 8077) जप्त करण्यात आली आहे. ८००००/- रु असा ऐकून १५६०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर तीनही आरोपींविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५, ४/२५ सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरात होऊ शकणारा एक मोठा संभाव्य गुन्हा टळला आहे. सपोनी अनिल चांदोरे, पोलीस उपनिरीक्षक विशाल पोळ आणि डी. बी. पथकाचे अंमलदार पोहेकॉ जयसिंग चव्हाण, पोकॉ रवि राठोड, पोकॉ अमित घाटे, पोकॉ मोहसिन पठाण, आणि पोकॉ शुभम मारकंड चालक अक्षय शेळकेअ यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास अंजनगाव सुर्जी पोलीस करत आहेत.

## अमरावती ग्रामीण पोलीस दलातील ११ अधिकारी व अंमलदारांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

प्रतिनिधी २ जून

**अमरावती :** अमरावती ग्रामीण पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या ११ पोलीस अधिकारी व अंमलदारांचा निरोप व सत्कार समारंभ ३०/०५/२०२६ रोजी १ सत्कार मंथन हॉल, अमरावती येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष निकेतन कदम (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांचा शाल, श्रीफळ, मा. पोलीस महासंचालक यांचे स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र तसेच त्यांच्या पत्नीस साडी देऊन सन्मान करण्यात आला. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदारांची नावे



पुढीलप्रमाणे आहेतः संतोष विठ्ठलराव खांडेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग मोर्शी,. राजेश देविदास काळकर, पोलीस उपनिरीक्षक, उपविभाग कार्यालय अमरावती ग्रामीण ,सुरेश भावसिंग राठोड, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन चिखलदरा, अरुण मारोती मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक, नियंत्रण कक्ष, अमरावती ग्रामीण श्रेणी पोउपनि मनोहर नामदेवराव नांदणे ब.नं. १४११ विपोमनि. कार्यालय, अमरावती परीक्षेत्र, अमरावती., श्रेणी पोउपनि पुंडलिक रामचंद्र चव्हाण ब.नं. ९८२, पोलीस स्टेशन दत्तापूर, सपोउपनि. विजय पंजाबराव शेवतकर ब.नं.१३९९ पोलीस स्टेशन पथ्रोट , सपोउपनि सुरेश बनिसिंजी इंगळे ब.नं. १४७७ पोलीस मुख्यालय, अमरावती ग्रामीण. , पोहेकों दिलीप मधुकर राउत ब.नं.१०२७ पोलीस स्टेशन वरुड मसपोउपनि मनोरमा अरुण डोंगरदिवे ब.नं.१३८८ पोलीस स्टेशन दत्तापूर, पोना संतोषसिंह रघुनाथसिंह चौहान ब.नं.९३७ पोलीस स्टेशन वरुडयावेळी पोलीस अधीक्षक यांनी आपल्या मनोगतात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस दलात दिलेल्या प्रदीर्घ, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवेचे गौरवोद्गार काढून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास श्री. सतिश कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी, दर्यापूर, अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी, अमरावती ग्रामीण,. माधवराव गरुड, उपविभागीय पोलीस अधिकारी, धारणी, अशोक लांडे, प्र.पोलीस उपअधिक्षक (मुख्या) अमरावती ग्रामीण. तसेच अमरावती ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त अधिकारी-अंमलदारांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरक्षित प्रवासीसेवा व कर्मचाऱ्यांच्या सोयी-सुविधांसाठी कटीबद्ध-आ. सुलभा खोडके

**♦ अमरावती मध्यवर्ती बसस्थानकात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन थाटात साजरा**

प्रतिनिधी २ जून

**अमरावती:** अमरावती मध्यवर्ती बसस्थानक येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती आगार प्रशासन व एकमेव मान्यता प्राप्त महाराष्ट्र एसटी कामगार संघटना, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एसटी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या या कार्यक्रमाला महाराष्ट्र विधान परिषद सदस्य -आमदार संजय खोडके, आगार व्यवस्थापक - वैशाली भाकरे मॅडम, प्रीतीताई



संजय बंड, महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे विभागीय अध्यक्ष - नंदकीशोर नवाथे, विभागीय सचिव -मोहित देशमुख, मनपा स्थायी समिती सभापती -अविनाश मार्डीकर, आदींसह मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले कि, वर्ष १९४८ साली स्थापन झालेल्या एस.टी महामंडळाने मागील ७८ वर्षात अनेक -चढ उतारांचा सामना करून प्रवाश्यांना अधिक सुलभ, गतिमान व आरामदायक सेवा दिली आहे. यामध्ये चालक -वाहक व कामगारांनी सुद्धा महत्वाची भूमिका बजावली आहे. आज प्रवासाकरिता अनेक खासगी साधने उपलब्ध असली तरी तरी ग्रामीण भाग , खेडे दुर्गम अतिदुर्गम भागापर्यंत एस.टी. बस सेवेला पसंती दिली जाते. विद्यार्थी , महिला व जेष्ठ नागरिकांना सुद्धा सवलतीचा प्रवास मिळत असल्याने आज एस.टी. ची लाल परी प्रवाशांची प्रथम पसंती बनली आहे.शहरे, गाव -खेडे जिल्हे -तालूके एकमेकांशी जोडण्यात बससेवेचे फार मोठे महत्व असून यातून केवळ प्रवासीसेवा मिळत नाही तर सभ्यता,संस्कृती, धार्मिक परंपरा लोकविकास व लोकजीवनाचे सुद्धा आदानप्रदान होत असते. आगामी काळातही एस.टी. सेवा अधिक सक्षम होण्याकरिता सुरक्षित प्रवासीसेवा व एस.टी.चालक-वाहक व कर्मचाऱ्यांच्या सोयी-सुविधांसाठी कटीबद्ध असल्याचा विश्वास आ. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केला.

## 'ते पन्नास दिवस' कादंबरीच्या न्यायालयीन संघर्षातील कार्यकर्त्यांचा गौरव

प्रतिनिधी २ जून

**बडनेराः** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बडनेरा शहर शाखेच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ सभागृह, बुद्ध विहार, अशोक नगर, यवतमाळ रोड, नवी वस्ती, बडनेरा येथे संवाद व नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. वैज्ञानिक विचार, संविधान मूल्ये आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला बळ देणारी ही बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी महा. अनिसच्या वैज्ञानिक जाणीव विभागाचे जिल्हा कार्यवाह प्रा. नरेंद्र धर्माळे होते. प्रमुख अतिथी म्हणून कॉ. प्रतीक्षा ढोके (राज्य सचिव, AISF) आणि कॉ. सागर दुर्योधन (राज्य सचिव, AIYF) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी बडनेरा शहर शाखेचे कार्याध्यक्ष दिलीप



लाडे यांनी शाखेच्या मागील एक वर्षातील कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला. अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार, संविधान जागर अभियान, सामाजिक प्रबोधन, रक्तदान उपक्रम आणि विविध जनजागृती मोहिमांमधील कार्याचा आढावा त्यांनी मांडला. तसेच आगामी काळातील कार्यक्रमांचे नियोजन आणि संघटन विस्ताराबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी महा. अनिस अमरावती जिल्हा कार्याध्यक्ष प्रफुल मंदा श्रीधर यांनी जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या प्रसंगी युवक, विद्यार्थी आणि लोकशाही हक्कांच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणाऱ्या कॉ. प्रतीक्षा ढोके आणि कॉ. सागर दुर्योधन यांचा विशेष सत्कार करण्यात आला. लेखक पवन भगत यांच्या 'ते पन्नास दिवस' या कादंबरीसंदर्भात उभ्या राहिलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ स्तरापासून न्यायालयीन पातळीपर्यंत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या समर्थनार्थ उभारलेल्या संघर्षातील त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

## जिल्ह्यात जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७ जणांवर दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी २ जून

**अमरावती:** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावतीद्वारे ३१ मे या जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यंदा हा दिवस 'आकर्षणाचा मुखवटा उतरवूया: तंबाखू आणि निकोटीनच्या व्यसनाचा प्रतिकार करूया' या संकल्पनेवर साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, जिल्ह्यातील शासकीय कार्यालये, बस स्थानक व रेल्वे स्टेशन येथे पोस्टर्स लावून जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान तंबाखू नियंत्रण कायदा (कोटपा-२००३) अंतर्गत दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या ७ व्यक्तींकडून १ हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच नागपुरी गेट पोलिसांच्या मदतीने पठाणपुरा व चांदणी चौक परिसरातील अवैध तंबाखू विक्रेत्यांवर धाड टाकून, १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू विकणाऱ्या आणि शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात विक्री करणाऱ्या १० विक्रेत्यांवर कारवाई करत २ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अशा प्रकारे एकूण १७ व्यक्तींकडून ३ हजार ३०० रुपयांची दंडवसुली झाली.

## लोकमाताअहिल्याबाई वैराग्य अन् विरतेचे प्रतिक- डॉ. तराळ

प्रतिनिधी २ जून

**अमरावती:** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर अठराव्याव्या शतकातील महान लोकमाता ,दैदीप्यमान स्त्रीरत्न, कर्त्यासुधारक व उपभोग शून्य स्वामिनी होत्या. वैराग्य आणि वीरता यांचे अद्भुत रसायन त्यांच्या रक्तात होते. त्या साठ वर्षे राज्यकारभार करणाऱ्या एकमेव, शिवरायाच्या शेवटच्या वारसदार व मराठी शाहीतील सुवर्ण युगाच्या निर्मात्या होत्या. अशा आशयाचे उद्गार डॉ सतीश तराळ यांनी काढले.

अहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त विद्युत नगर येथील अहिल्याबाई होळकर चौकात आयोजित करण्यात आलेल्या अहिल्याबाई होळकर जयंती समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. बहुजन आघाडी व नवसारी मित्र मंडळ यांच्या वतीने



एडवोकेट अचल कोल्हे व मित्रमंडळीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ सतीशतराळ पुढे म्हणाले अहिल्याबाई निधर्मी ,सर्वधर्म समभाव जोपासणाऱ्या होत्या. त्या अत्यंत न्यायनिष्ठ असून स्वतःच्या पती वर त्यांनी दंडात्मक कारवाई केली होती. त्यांनी कुप्रथांचे उच्चाटन केले. हुंडाबंदी , विधवा विवाह विवाहास प्रोत्साहन दिले. धार्मिक स्थळांचा विकास केला . ठिकठिकाणी अन्नसत्र सुरू केले. याप्रसंगी नगरसेवक प्रशांत महल्ले नगरसेवक ऋषिकेश देशमुख नगरसेविक अनिता काळे उपस्थित होत्या. यावेळी प्रकाश बनारसे अक्षय देशमुख खटाळे गुरुजी डॉ.पातूर्डे श्री जवंजाळ व इतर काही मान्यवरांनी अहिल्याबाईंना आदरांजली अर्पण केली . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अविनाश पांडे होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अचल कोल्हे गजानन व्यवहारे वासुदेव रावकेचे, प्रफुल्ल इंगोले, गजानन मनोहरे, संदीप इंगळे, मिलिंद बोधिले, यांनी परिश्रम घेतले यावेळी देवी दासजी कोल्हे ,कृष्णराव कुलट अविनाश पांडे इत्यादी मंडळी उपस्थित होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि २ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर,
बोगस कॅरेक्टर...




## डॉ. माने यांचे राजकारण, पैशाचे धोरण, जन्मापूर्वीच चिमुकल्याचे मरण...

### जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...

# स्त्रीभृणहत्या पुन्हा पुन्हा दाखल करा खुनाचा गुन्हा !




*** रिसोड, कारंजा व मालेगावातील कारवाईमुळे खळबळ *जिल्ह्यात अनेक ठिकाणी असे गैरप्रकार सुरू**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

स्त्री भ्रुणहत्या म्हणजे नवजात मुलींची जाणीवपूर्वक केलेली हत्या होय. पैशासाठी डॉक्टर मानवतेला कळीमा फासणारे कृत्य करतात. भारतात कायद्याने लिंग निदानाला बंदी आहे. कठोर कायद्ये करूनही डॉक्टर व दलाल यांच्या माध्यमातून दररोज स्त्रीभ्रुण हत्येचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे स्त्रीभ्रुण हत्येच्या पुन्हा पुन्हा घडणाऱ्या प्रकारावर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी आता होत आहे. स्त्रीभ्रुण हत्येबाबत कडक कायद्ये करूनही राजकीय जोरावर पळवाटा काढणाऱ्या कारंजाच्या डॉक्टर रजनी राठोड व रिसोडचे डॉक्टर भोपळे व आता मालेगावचे डॉ. माने दाम्पत्य यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करून जन्मठेप करावी अशी मागणी आता जनतेतून होत आहे.

बीडमधील स्त्री भ्रूण हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता परळीतील डॉ. सुदाम मुंडे आणि डॉ. सरस्वती मुंडे यांची कृत्य ऐकल्यानंतर राज्यात संतापाची लाट पसरली होती. असाच प्रकार एका वर्षापूर्वी रिसोड शहरातील लोणी फाटा येथील डॉक्टर भोपळे यांच्या शिव मुळव्याध हॉस्पिटल व प्रस्तुती गृह येथे उघडकीस आला होता. रिसोड शहरामध्ये लोणी फाटा येथील शिव मुळव्याध हॉस्पिटल व प्रसुती गृह येथे स्त्रीभ्रूणहत्या होत असल्याचे गोपनीय माहितीच्या आधारावर कारवाई केली होती. त्यानंतर आता आरोग्य विभागाने कारजा येथील सोनोग्राफी सेंटरवर छापा टाकून लिंग चाचणी करतांना पाच महिला आढळल्या. त्यामुळे या पथकाने राठोड सोनोग्राफी राठोड मॅटर्निटी जनरल हॉस्पीटलवर कारवाई करून सोनोग्राफी मशिन सिल केली आहे. तर आता मालेगाव येथील माने सोनोग्राफी सेंटरवर कारवाई करून स्त्रिभृण हत्येचा प्रकार उघडकीस आला आहे. जिल्ह्यातील या तिसऱ्या धडक करवाईने जन्मापुर्वीच चिमुकल्याचा घात केल्या जात असून रिसोड, कारंजा,




नंतर आता मालेगावातही गर्भपात होत असल्याचे उघड झाले आहेत. उमलण्यापूर्वीच कळी कुस्करल्या जात असून पैशासाठी डॉक्टर अनेकांचे बळी घेत आहेत. या स्त्रिभ्रूण हत्येच्या गोरखधंद्यात जिल्ह्यातील रिसोड येथील भोपळे, कारंजातील डॉक्टर रजनी राठोड तर मालेगाव येथील डॉ. माने दाप्म्त्य या प्रकरणात अडकले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात स्त्रिभ्रुणहत्येचे रॅकेट असल्याचे उघड झाले आहे. शासनाने कठोर कायद्ये करूनही कायद्याचा धाक या डॉक्टरांना राहीला नाही. त्यामुळे पुन्हा पुन्हा स्त्रीभ्रुण हत्या करणाऱ्या जन्मापूर्वीच हजारो बळी घेणाऱ्या डॉक्टरांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी होत आहे.

### डॉक्टरांचे चॅलेंज, म्हणे प्रकरण करतो मॅनेज

कारंजा येथील डॉक्टर रंजनी राठोड व मालेगाव येथील डॉक्टर विवेक माने यांना राजकारणाची व्हाईट कॉलर असून काळ्या कृत्यानंतरही त्यांची वागण्याची कृती ताईट आहे. मानवतेला कळीमा फासणाऱ्या कृत्यामुळे राजकारणातून समाजकारणाचा खोटा आव आणणारे डॉ. राठोड व डॉ. माने यांच्या सोनोग्राफी सेंटरवर आरोग्य विभागाने धाड टाकल्याने हे उघड झाले आहेत. यावर डॉक्टरांनी राजकीय व पैशाच्या जोरावर चॅलेंज केले आहे. प्रकरण वरिष्ठ स्तरावरून मॅनेज करणार असल्याच्या वल्गना करीत आहेत. चोरच्या चोर वरून मुजोर असणाऱ्या कारंज्याच्या डॉ. राठोड मालेगाव चे डॉ. माने यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात... कारवाई न करण्याचा करार, आरोपी फरार

ऐरवी कायद्याच्या धाकावर नसलेल्यांना आरोपी करणारी यंत्रणेने पैशासाठी ज्ञात आरोपीला अज्ञात दाखविल आहे. कारवाई न करण्याचा करार असल्यामुळेच आरोपी फरार झाला आहे. या सर्व प्रकारात ३० वर्षापासून डॉ.माने दाम्पत्य जन्मापुर्वीच चिमुकल्याचे बळी घेत आहेत. पैशाच्या खेळीमुळे अद्यापही त्यांचावर कारवाई झाली नाही. त्यामुळे महापापात सहभागी असलेल्या अज्ञात महिला डॉक्टरला पोलिसांनी 'ज्ञात' करून गजाआड करावे.तसेच आरोग्य विभागाने अविवेकी डॉक्टरच्या सोनोग्राफीच्या गोरखधंद्याला कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी जागरूक जनतेकडून केल्या जात आहे.

## थोडक्यात

### वाशिममध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचा घोटाळा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्ह्यात बोगस दिव्यांग (UDID) प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकऱ्या, पदोन्नती व विविध लाभ घेतल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते गजानन इढोळे यांनी केला आहे. या प्रकरणातील संशयित कर्मचारी-अधिकाऱ्यांची यादी प्रशासनाकडे सादर करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. गेल्या दोन वर्षांपासून विविध स्तरांवर तक्रारी करूनही चौकशी होत नसल्याने सर्व संशयितांची मुंबईतील जे.जे. रुग्णालयात स्वतंत्र वैद्यकीय तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दोषींवर फौजदारी कारवाई करून खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळावा, अशी मागणी इढोळे यांनी केली असून आवश्यक असल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही दिला आहे.

### जनभागीदारीतून 'निक्षय मित्र' योजना प्रभावीपणे राबवा -अर्पित चौहान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा परिषद वाशिम येथे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत समन्वय सभेचे आयोजन मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी जनभागीदारीतून 'निक्षय मित्र' योजना प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले.

तर त्याचे चांगले फळ आणि पुण्य निश्चितच मिळते. समाजातील जास्तीत जास्त दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन किमान एक तरी क्षयरुग्ण दत्तक घ्यावा व त्याला धनधान्यरूपी मदत करावी.

## रिसोडच्या भ्रष्टाचारी पितापुत्राने दिली तक्रारकर्त्यास जीवे मारून टाकण्याची धमकी !

### रिसोड पोलीस ठाण्यात कथित - पुत्राच्या विरोधात रमीजखान यांची तक्रार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड येथील भ्रष्ट संस्थाचालक असलेल्या पितापुत्राने त्यांच्या बोगसकृत्याची एसआयटीकडे तक्रार करणाऱ्या रमीजखान या माजी शिक्षकास १४ मे रोजी रात्री रस्त्यात अडवून जीवे मारण्याची धमकी दिली. राजाश्रय असलेल्या भ्रष्ट पिपापुत्राच्या विरोधात रमीजखान यांनी या प्रकरणी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.रिसोड पोलीसांनी सद्य स्थितीमध्ये या प्रकरणी आरोपींविरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करून या तक्रारीची नोंद अदखलपात्र गुन्ह्याच्या नोंदवही मध्ये घेतली आहे.

रिसोड येथील कबीर मोहसिन शेख आणि त्यांचे पुत्र बकार मोहसिन शेख हे ट्रस्टी असलेल्या रिसोड येथील उर्दू शाळेत रमिजखान अहेमदखान हे शिक्षक म्हणून कार्यरत होते.त्यांनी 'या' भ्रष्ट पितापुत्राना नोकरीवर लावण्यासाठी डोनेशनरूपी लाखो रूपये सुद्धा दिले होते. रमीजखान नोकरीवर असताना भ्रष्ट पितापुत्राने रमीजखान या गरीब आणि गरजू शिक्षकाला नोकरीवरून काढून टाकले.आणि त्यांच्या रक्ताच्या नात्यातील नवीन शिक्षकाची नियुक्ती करुन रमीजखान यांनि बेरोजगार करून त्यांचेवर अन्याय केला.नोकरीवरून काढून टाकल्यानंतर कथित आणि भ्रष्ट संस्थाचालक म्हणून बदनाम झालेल्या पितापुत्राने रमीजखान यांना नोकरीवर लावण्यासाठी घेतलेले लाखो रूपयाचे डोनेशनची रक्कम परत देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे वास्तव आहे.अनेक वेळा चकरा मारूनही त्या भ्रष्ट पितापुत्राने रमीजखान यांचे डोनेशन म्हणून घेतलेले लाखो रूपये अद्यापही परत केले नाहीत. कबीर मोहसिन शेख आणि बकार मोहसिन शेख हे पितापुत्र स्वत:ला संस्थेचे ट्रस्टी न मानता आधुनिक संस्थानिक, जहाँगिरदार समजतात. त्यांच्या संस्थेमध्ये त्यांच्या घरच्या मंडळीसह जवळच्या नात्यातील लोकांचा भरणा जास्त आहे. दोन, अडीच महिन्यापुर्वी रमीजखान यांनी कबीर मोहसीन शेख यांच्या संस्थेमध्ये झालेल्या आणि अजूनही सुरू असलेल्या कारनाम्याबद्दल थेट एसआयटीकडेच पुराव्यानिशी तक्रार दाखल केली. या तक्रारीची चौकशीसुद्धा झाली असून कबीर मोहसिन शेख यांचे विरोधात कारवाई होणार असल्याने या' पितापुत्राने बेरोजगार झालेले आणि सद्या मजुरी करत टसलेले रमीजखान यांना १४ मे रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास अडवून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.त्या भ्रष्ट पितापुत्राकडून रमिजखान यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.सद्या रमीजखान यांची तक्रार अदखलपात्र गुन्हा नोंदवही मध्ये करण्यात आली आहे. दोषींवर कडक कारवाई करुन रमीजखान यांना न्याय द्यावा.अशीही मागणी रमिजखान यांनी केली आहे.

## सफाई कामगारांचे पगार नियमित करा - सौ.किरणताई गिऱ्हे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम नगर परिषदेमध्ये शहरातील कचरा संकलन करणारे व शहरातील विविध भागात सफाईचे कामे करणाऱ्या सफाई कामगार यांना नगरपरिषदे अंतर्गत पगार देण्यात येतो. या पगारातून त्यांच्या परिवाराचा चरितार्थ चालवीला जातो. हे हे सफाई कामगार इमाने एक बार आपले काम करून शहर स्वच्छ ठेवून मोलाचा सहभाग देत असतात. मात्र या सफाई कामगारांना दर महिन्याला वेळेवर त्यांचे पगार होत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे या सफाई कामगारांचे व कचरा संकलन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांचे वेतन त्यांना दर महिन्याच्या एक तारखेला नियमित मिळावे. या



आशियाचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश सदस्य सौ किरण ताई समाधान गिऱ्हे यांच्या नेतृत्वात नपचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले यावेळी वंचित बहुजन आघाडी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक सपकाळ, पत्रकार गोपाल भिसडे, स्वप्निल खांदळे, आकाश पंडित, अक्षय सपकाळ, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## अट्टल चैन स्नॅंचरला पोलिसांनी ठोकल्या बेड्या !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहरात मागील काही महिन्यांपासून महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावण्याच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर या प्रकरणातील अट्टल चोरट्याला अटक करण्यात वाशीम शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाला यश आले आहे. हसन अली नवाज अली रा.भुसावळ असे या अटक आरोपीचे नाव आहे.

वाशीम शहरामध्ये महिलांच्या गळ्यातील दागिने चोरीच्या अनेक घटनांमध्ये मोठी वाढ झाली होती. वाढत्या घटनांमुळे पोलिसांसमोर



आरोपींना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेतला जात होता. तपासादरम्यान दागिने हिसकावणारा संशयित युवक हा भुसावळ येथील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.त्यानंतर दि.३१ मे रोजी पोलिसांचे एक पथक भुसावळ येथे रवाना झाले. तेथे संशयित युवक हसन अली याला ताब्यात घेऊन कसून चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने वाशीममध्ये झालेल्या चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्याची कबुली दिली.या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला हसन अली याला अटक करण्यात आले आहे. आरोपीकडून आणखी काही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. तसेच याचा एक आणखी साथीदार फरार असून त्याचा शोध घेतला जात आहे. चोरी केलेले सोन्याच्या दागिने हस्तगत करण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथक प्रमुख सापोनि. जितेंद्र आडोळे ,पोहेकाँ .अष्टसिध्द नप्ते, पोकाँ .विशाल इंगळे ,पोकाँ .किशोर खंडारे, पोकाँ. उमेश चव्हाण, नंदकिशोर कुराडे ,राजेश राठोड यांनी केली.

## अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...

# भ्रष्टाचाराची चतु:सुत्री, कामे कागदोपत्री !

### म्हणे सिईओच भ्रष्टाचारात साथी, चौकशी समिती आमच्या हाती

● प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील अंचळ ग्रामपंचायतीमध्ये १५ वा वित्त आयोग, १४ वा वित्त आयोग तसेच विविध योजनांमधून झालेल्या विकासकामांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील विविध व्हाउचर आणि खर्चाच्या नोंदींमुळे ग्रामस्थांमध्ये चर्चेला उधाण आले असून, नोंदविलेल्या खर्चानुसार प्रत्यक्षात कामे झाली आहेत का, तसेच ती मंजूर अंदाजपत्रकानुसार पूर्ण करण्यात आली आहेत का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील अनेक व्हाउचरमध्ये विविध खर्चाच्या नोंदी दिसून येत आहेत. मात्र या खर्चाच्या बदल्यात नेमकी कोणती कामे झाली, कोणाला देयके अदा करण्यात आली, तसेच कामांचा दर्जा काय आहे, याची निष्पक्ष पडताळणी होणे आवश्यक असल्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे १५ वा वित्त आयोग, १४ वा वित्त आयोग तसेच इतर विविध निधीतील सर्व कामांची तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे, परिसरात 'सीईओच आमच्या हाती आहेत, मग आमची चौकशी होणार कशी?' अशी चर्चा सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या वक्तव्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, या दाव्यामागील सत्य काय आहे हेही चौकशीतून स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे.दरम्यान, संबंधितांकडून 'आमची सर्व कामे पारदर्शकपणे पार पडली आहेत' असा दावा करण्यात येत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे जर सर्व कामे नियमांनुसार आणि पारदर्शकपणे झाली असतील, तर चौकशीमधून सत्य जनतेसमोर येईल, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.अंचळ ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, स्मशानभूमी सुशोभीकरण, पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर योजनांतील खर्चाची प्रत्यक्ष पाहणी करून, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रक, बिले, व्हाउचर व देयकांची सखोल तपासणी करण्यात यावी आणि अनियमितता आढळल्यास संबंधित दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### हा घ्या व्हाउचरचा पुरावा; असे कितीतरी व्हाउचर, सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती

अंचळ ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग तसेच इतर निधीच्या खर्चाबाबत संशय व्यक्त केला जात असताना, ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील अनेक व्हाउचर सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागले आहेत. या नोंदींमुळे ग्रामस्थांमध्ये चर्चेला उधाण आले असून, खर्च दाखविलेल्या रकमा आणि प्रत्यक्ष कामांची पडताळणी करण्याची मागणी जोर धरत आहे.सिटी न्यूज सुपरफास्टकडे उपलब्ध झालेल्या व्हाउचरमध्ये लाखो रुपयांच्या खर्चाच्या नोंदी आढळून येत आहेत. काही ठिकाणी कार्यालयीन खर्च, काही ठिकाणी मजुरी, तर काही ठिकाणी विविध विकासकामांच्या नावाने खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र संबंधित कामे प्रत्यक्षात झाली का, ती मंजूर अंदाजपत्रकानुसार झाली का आणि खर्चाच्या बदल्यात जनतेला काय लाभ झाला, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, ई-ग्रामस्वराजवरील नोंदी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांची स्वतंत्र चौकशी झाल्यास अनेक बाबी समोर येऊ शकतात. त्यामुळे १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग, स्मशानभूमी सुशोभीकरण, पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर विकासकामांवरील खर्चाची सखोल तपासणी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.दरम्यान, संबंधितांकडून सर्व कामे पारदर्शकपणे झाल्याचा दावा केला जात असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे जर सर्व काही नियमांनुसार झाले असेल, तर व्हाउचर, बिले, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रके आणि प्रत्यक्ष कामांची पडताळणी करण्यास कोणतीही अडचण नसावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे.




## डीएपी खतासोबत इतर खताची सक्ती विक्रेत्यांनी करू नये - घनश्याम मापारी

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

खरिपाचा हंगाम सुरू होणार असून शेतकरी खते व बियाणे खरेदी करण्याच्या लगबगीत आहेत परंतु खताचा प्रचंड तुटवडा असून दर सुद्धा अगदी गगनाला भिडले आहेत खते खरेदी करताना शेतकऱ्यांची प्रचंड पायपीट होऊन दमछाक होत आहे अशातच डीएपी खतासोबत खते विक्रेते इतर अनावश्यक खताच्या बॅग सक्तीची संलग्न करून शेतकऱ्यांच्या माथी मारून शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडणूक करीत आहेत सदर बाब अत्यंत गंभीर असून खते विक्रेत्यांनी डीएपी खतासोबतची लिंकिंग बंद करून शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार विना लिंकिंग मुबलक प्रमाणात डीएपी खते द्यावीत अन्यथा या शेतकरी विरोधी आडमुठ्या धोरणा विरोधात रिसोड तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशाने पश्चिम विदर्भ प्रमुख खासदार अरविंद सावंत, खासदार संजयराव देशमुख, जिल्हा संपर्कप्रमुख दिलीपराव जाधव, जिल्हा सह संपर्कप्रमुख डॉ. सुधीर कव्हर, वाशिम जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, यांच्या मार्गदर्शनात रिसोड विधानसभा संपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, उपजिल्हाप्रमुख डॉ. चंद्रशेखर देशमुख, यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यासह तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केले जाईल, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे कळविली आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. २ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## साहित्य लंपास; अज्ञातावर गुन्हा

**घाटपुरी शिवारातील गिट्टी खदान परिसरातील घटना**

**खामगाव:** तालुक्यातील घाटपुरी शिवारातील एका गिट्टी खदान परिसरातून लोखंडी अँगलचे तुकडे चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. सुटाळपुरा येथील सागर राजेंद्र काळे (४५) यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची पिंपळगाव रोडलगत घाटपुरी शिवारात गिट्टी खदान असून, त्या ठिकाणी बांधकामाचे काम सुरू आहे. कामादरम्यान शिल्लक राहिलेले नवीन लोखंडी अँगलचे तुकडे खदान परिसराच्या बाहेरील जागेत एकत्रित ठेवण्यात आले होते. ३० मे रोजी सायंकाळी ७:३० वाजताच्या सुमारास सागर काळे व त्यांचा भाऊ खदान परिसराची पाहणी करण्यासाठी गेले असता, ठेवलेले लोखंडी अँगलचे तुकडे जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तपासणीअंती अज्ञात व्यक्तीने सुमारे ९० किलो वजनाचे लोखंडी साहित्य चोरून नेल्याचे स्पष्ट झाले.

# कृषी विभागाची तपासणी मोहीम; कृषी केंद्रांना नोटीस

## खतांचा काळाबाजार झाल्यास कारवाईचा इशारा

प्रतिनिधी २ जून

**खामगाव:** खामगाव खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खामगाव शहरात कृषी विभागाने अचानक तपासणी मोहीम राबवून दोन कृषी केंद्र चालकांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. डीएपी खताचा साठा उपलब्ध असूनही काही केंद्रांत शेतकऱ्यांना खत देण्यास नकार दिला जात असल्याच्या तक्रारी वाढल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

या संदर्भात खामगावातील कृषी केंद्रांत डीएपी खत उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना ते दिले जात नसल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. कृषी विभागाने तातडीने दखल घेत तपासणी मोहीम सुरू केली. १ जून रोजी कृषी विभागाचे गुणनियंत्रक अमोल बंड यांनी शहरातील काही कृषी केंद्रांची तपासणी केली.

तपासणीदरम्यान दोन कृषी केंद्र चालकांनी साठा उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना डीएपी खत देण्यास नकार दिल्याचे आढळून आले. त्यानंतर संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या असून सर्व केंद्र चालकांना नियमांनुसार खतविक्री करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

**कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न**
अधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, साठा उपलब्ध असूनही खत न देणे किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणे यासारख्या प्रकारांवर कठोर कारवाई केली जाईल. दरम्यान, खरीप हंगामाच्या तोंडावर जिल्ह्यात खतांचा काळाबाजार सुरू असल्याच्या आरोपांना या कारवाईमुळे बळ मिळाल्याचे बोलले जात आहे. कृषी विभागाच्या या पावलामुळे खत वितरण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मानले जात आहे.

**तपासणीत १० ते १२ कृषी केंद्रांचा समावेश**
कृषी विभागाचे गुणनियंत्रक अमोल बंड यांनी १ जून रोजी खामगाव शहरातील सुमारे १० ते १२ कृषी केंद्रांची तपासणी केली. या तपासणीत काही केंद्रांमध्ये डीएपी खताचा साठा असूनही शेतकऱ्यांना तो दिला जात नसल्याचे निदर्शनास आले.

**कठोर कारवाईचा इशारा**
कृषी विभागाने सर्व कृषी केंद्र चालकांना खतविक्री नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. साठा उपलब्ध असूनही नकार देणे किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणे यासारख्या प्रकारांवर कारवाई केली जाईल.

# बंद घरातून रोकड लंपास

## शहर पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २ जून

**खामगाव:** शहरातील गजानन कॉलनी परिसरात बंद घर फोडून रोकड आणि सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

ढोरपगाव येथील रहिवासी तथा सध्या गजानन कॉलनी, खामगाव येथे वास्तव्यास असलेले राहुल रामधन धुरंधर (वय ४६) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, ते शेतीच्या कामानिमित्त मूळ गावी गेले होते. घराला कुलूप लावून बाहेर असताना ३१ मे २०२६ रोजी त्यांच्या शेजाऱ्यांनी फोन करून घराचा दरवाजा उघडा असल्याची माहिती दिली. घरी परतल्यानंतर धुरंधर यांनी पाहणी केली असता घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला, तसेच दोन्ही बेडरूममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. कपाटांचे लॉकर व कुलूप तोडून त्यातील वस्तूंची फेकाफेक करण्यात आली होती. यामध्ये मुलाच्या पैशांच्या गल्ल्यातील सुमारे ३ हजार रुपये रोख तसेच १२ मणी व धम्मचक्र असलेली सुमारे २ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत असा एकूण ८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# खामगाव शहरासह परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसल्या; वीजपुरवठा ठप्प!

प्रतिनिधी २ जून



**खामगाव:** खामगाव शहरात रविवारी बदल होऊन जोरदार वादळी वाऱ्यासह तुरळक पावसाची नोंद झाली. सायंकाळी सुमारे ६.३० वाजल्यानंतर काळे ढग दाटून आल्याने शहरासह परिसरात अंधाराचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर काही वेळ जोरदार वेगाने वारे वाहू लागले आणि तुरळक स्वरूपाचा पाऊस झाला. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पावसाने सोमवारी सायंकाळी संग्रामपूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर कहर केला. या नैसर्गिक आपत्तीमुळे फळपिकांसह रब्बी व उन्हाळी पिकांचे मोठे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी पिके जमीनदोस्त झाली आहेत. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांपुढे नव्या संकटाचे आव्हान उभे राहिले आहे. तडाख्यामुळे अनेक भागांत झाडे उन्मळून पडली. शेगाव येथे रस्त्यावर झाड कोसळून वाहतूक ठप्प झाली होती. सोमवारी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान अचानक वादळी वाऱ्याने झाड कोसळून पडले असून वाहतूक विस्कळीत झाली. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून, शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा लागला.

पिंपळगाव राजा परिसरात सोमवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास आलेल्या वादळी वाऱ्यामुळे हिवरा खुर्द येथील शेतकरी भास्कर लक्ष्मण इंगळे यांच्या गट क्रमांक ६० मधील केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

# प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त

## खामगावातील आईस्क्रीम पार्लरमध्ये कारवाई

प्रतिनिधी २ जून

**खामगाव:** शहरातील बारादरी परिसरातील एका आईस्क्रीम पार्लरमध्ये अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करून प्रतिबंधित पानमसाला, सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थांचा साठा जप्त केला. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात संबंधित व्यावसायिकाविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बारादरी येथील एका आईस्क्रीम पार्लरमध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री होत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार ३१ मे रोजी दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास संबंधित आस्थापनेची पंचांसमक्ष तपासणी करण्यात आली.



तपासणीदरम्यान विविध प्रकारचे प्रतिबंधित पानमसाला, सुगंधित तंबाखू व तत्सम अन्नपदार्थ मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेले आढळले. या कारवाईदरम्यान एकूण ५ हजार ९९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**आरोपीवर गुन्हा दाखल**
चौकशीत हा साठा अनुपकुमार सुखदेव अरडेजा (रा. तलाव रोड, खामगाव) यांच्या ताब्यात असल्याचे निष्पन्न झाले. राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार राज्यात अशा प्रकारच्या पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, विक्री व वितरणावर बंदी असतानाही संबंधितांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे तपासात समोर आले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील विविध तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रीना सदार करत आहेत.

# तीन महिन्यांच्या धान्य वितरणात गोंधळ; लाभार्थी तांदळापासून वंचित!

## ई-पॉस मशीनवर नोंद; मात्र प्रत्यक्षात वाटप नाही!

प्रतिनिधी २ जून

**खामगाव:** राज्य शासनाने उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांचे रेशन धान्य एकत्रितपणे वितरित करण्याचे निर्देश दिले होते; मात्र जिल्ह्यात त्रैमासिक धान्य वितरण प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी लाभार्थ्यांना अपूर्ण धान्य वाटप करण्यात आले असून, काहींना गहू व मका मिळाला असला, तरी तांदूळ मिळालाच नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

धान्य वितरणादरम्यान काही रेशन दुकानांमध्ये तांदळाचा साठा संपल्याने अनेक लाभार्थींना तांदूळ न देता परत पाठविण्यात आल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः वितरणाच्या शेवटच्या टप्प्यात रेशन घेण्यासाठी आलेल्या नागरिकांना या समस्येला सामोरे जावे लागल्याची माहिती आहे. लाभार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, पॉस मशीनवर धान्य वितरणाची नोंद करण्यात आली; मात्र प्रत्यक्षात तांदूळ मिळाला नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, धान्य वितरण प्रक्रियेतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दरम्यान, त्रैमासिक धान्य वितरणाची घोषणा करण्यात आली असली तरी पुरेसा साठा उपलब्ध नसणे, नियोजनाचा अभाव आणि वितरण व्यवस्थेतील अडचणी यामुळे अनेक ठिकाणी लाभार्थ्यांना संपूर्ण धान्य मिळू शकले नसल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन वंचित लाभार्थ्यांना उर्वरित धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांना दहा तास वीज मिळावी; शेतकऱ्यांचा फुली सबस्टेशनवर कार्यकारी अभियंत्यांना घेराव आंदोलन

प्रतिनिधी २ जून

**नांदुरा :** तालुक्यातील फुली सबस्टेशअंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना किमान दहा तास विद्युत पुरवठा देण्यात यावा या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात उपकार्यकारी अभियंता आर जी तायडे यांना घेराव आंदोलन घालून शेतकऱ्यांच्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की, शेतकऱ्यांना शेतीपंपाची लाईट अगोदर आठ तास झाली, आता सहा तास असल्याने शेतकऱ्यांना शेती मशागतीसाठी ती दहा तास करण्यात यावी तसेच चोरी गेलेल्या तारा, तुटलेले पोल त्वरित बसवण्यात यावे.मेंढळी येथील मुधडा डीपीवरील दोन पोल त्वरित बसवण्यात यावे, येथील पुरुषोत्तम राणे यांच्या शेतातील पडलेले पोल त्वरित बसवण्यात यावे, वडनेर भोलजी - टाकरखेड जिल्हा परिषद मतदार संघातील सर्व ट्रान्सफरचा मेंटेनन्स तात्काळ करण्यात यावा, शेतात राहणाऱ्या शेतकऱ्यांना संध्याकाळी सहा वाजता सिंगल फेज तात्काळ सुरू करण्यात यावे, फुली येथील गवई डीपीवरील पडलेला पोल तात्काळ उभारण्यात यावा मेंढळी येथील ठाकरे डीपी पोल बदलण्यात यावा या मागणीचे निवेदन कार्यकारी अभियंता आर.जी तायडे यांना देण्यात आले, निवेदनावर शिवसेना सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, मलकापूर शिवसेना शहर प्रमुख हरिदास गणबास, गोपालसिंह राजपूत, पप्पू नारखेडे, बाळकृष्ण पाटील, शिवाजी पाटील, संतोष कडाळे, धिरज मापारी, दिनेश गायकवाड, सतीश मानकर, पांडुरंग मानकर, गजानन गायकवाड, केशव मापारी, बाळू गणगे, मंगेश मापारी, गजानन नेमाने, नंदू कोळसकर, अमोल मापारी, महादेव गणगे, बाळूभाऊ नेमाने, गोपालसिंग जाधव, बळीराम सरोदे, उदय सरोदे सह आदी शेतकरी व शिवसैनिकांची उपस्थिती होती.



# सफाई कामगारांवरील अन्यायाच्या निषेधार्थ सकल मेहतर समाजाचे धरणे

## उपविभागीय अधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन

प्रतिनिधी २ जून

**खामगाव:** अनुसूचित जाती प्रवर्गातील मेहतर समाज व सफाई कामगारांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचार आणि भेदभावाच्या निषेधार्थ सकल मेहतर समाजाच्या वतीने सोमवारी उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. यानंतर विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केले की, १५ मे २०२६ रोजी प्रभाग क्रमांक १२ मधील मुकरदम सुनील रमेश उज्जैनवाल, तसेच इतर सफाई कामगारांसोबत घडलेली घटना अत्यंत असून, ती मानवतेला काळिमा फासणारी आहे. या घटनेमुळे संपूर्ण मेहतर समाजाच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचली असून समाजामध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. दरम्यान, सफाई कामगार हे समाजाच्या आरोग्य व स्वच्छतेचे प्रमुख आधारस्तंभ आहेत; मात्र त्यांच्यावर सातत्याने अन्याय, अत्याचार आणि भेदभावाच्या घटना घडत असून याकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.मेहतर समाज, सफाई कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना संविधानाने दिलेले संरक्षण, सन्मान, न्याय आणि मूलभूत हक्क प्रत्यक्षात मिळावेत, यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच निदर्शने करण्यात आली. संबंधित पीडितांना तातडीने न्याय मिळावा, त्यांच्या सुरक्षेची हमी देण्यात यावी आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी विशेष धोरण आखावे, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

# शिवसेना (उबाठा) आक्रमक! वर्षभरापासून अंधारात असलेल्या देवधाबा येथील शेतकऱ्यांना मिळवून दिला न्याय

प्रतिनिधी २ जून

**मलकापूर:** तालुक्यातील देवधाबा येथून एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. येथील पंधरा ते वीस शेतकऱ्याच्या शेतात तब्बल एक वर्षापासून वीज पुरवठा खंडित असल्याने शेतकरी पुरते हवालदिल झाले होते. अखेर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने या प्रकरणात आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरले आणि वर्षभरापासून रखडलेला विजेचा प्रश्न अवघ्या काही तासांत मार्गी लावला. यामुळे देवधाबा परिसरात शिवसेना पदाधिकारी आणि शिवसेना (उबाठा) पक्षाचे कौतुक होत आहे.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

देवधाबा येथील स्मशानभूमी जवळील विनोद पाचपोळ डीपी वरील शेतकऱ्याच्या शेतातील विजेच्या खांबावरील (पोल) तारा थेट जमिनीपर्यंत लोंबकळल्या होत्या. यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता होती. मात्र, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याऐवजी स्थानिक वायरमनने चक्क हायड्रा क्रेनची व्यवस्था होत नसल्याचे किरकोळ कारण पुढे केले. क्रेन नाही म्हणून वायरमनने गेल्या एक वर्षापासून शेतातील डीपीवरून (रोहित्र) वीज पुरवठाच पूर्णपणे बंद करून ठेवला होता.

एक वर्ष उलटूनही वीज मिळत नसल्याने शेतातील उभी पिके वाळून चालली होती आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडला होता. महावितरणच्या



**शिवसेना (उबाठा) आक्रमक; अधिकाऱ्यांना धरले धारेवर!**
शेतकऱ्यांची ही गंभीर व्यथा ऐकताच उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर कमालीचे संतापले. त्यांनी तात्काळ आपल्या कार्यकर्त्यांसह देवधाबा येथील संबंधित शेतकऱ्याच्या शेतात धाव घेतली. त्याच ठिकाणी त्यांनी 'एमएससीबी' (MSEB) च्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतले आणि त्यांना चांगलेच धारेवर धरले.
शेतकऱ्याची समस्या आताच्या आता मार्गी लावा, नाहीतर देवधाबा येथील शेतकरी आणि शिवसेना (उबाठा) तुमच्या कार्यालयात येऊन 'ठेचा-भाकर' खाऊन तीव्र आंदोलन करण्यासाठी बसेल! असा इशारा गजानन ठोसर यांनी अधिकाऱ्यांना दिला.

**आंदोलनाच्या इशाऱ्याने अधिकारी नरमले; काम सुरू!**
शिवसेनेचा हा आक्रमक अवतार आणि आंदोलनाचा थेट इशारा मिळताच महावितरणच्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले. वर्षभरापासून हायड्रा क्रेनचे कारण सांगणारे अधिकारी तात्काळ ?क्शन मोडमध्ये आले. त्यांनी काही वेळातच शेतात हायड्रा मशीन पाठवली आणि जमिनीवर लोंबकळणाऱ्या तारा, झुकलेले पोल सुव्यवस्थित करून वीज पुरवठा सुरू करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले.

**शेतकऱ्यांनी घेतली गजानन ठोसर यांची भेट**
अनेक प्रयत्न करूनही न्याय मिळत नसल्याने, अखेर देवधाबा येथील काही शेतकऱ्यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांची भेट घेतली. शेतकऱ्यांनी आपली व्यथा आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांची उदासीनता ठोसर यांच्यासमोर मांडली व न्याय मिळवून देण्याची विनंती केली.

**देवधाबा परिसरात आनंदाचे वातावरण**
शिवसेना (उबाठा) पक्षाने दाखवलेल्या या तत्परतेमुळे आणि आक्रमकतेमुळे वर्षभरापासून अंधारात असलेल्या शेतकऱ्याला अखेर न्याय मिळाला. वीज पुरवठा सुरू झाल्याचे पाहून देवधाबा परिसरात आज आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. वर्षभरापासून हवालदिल झालेल्या संजय सोनवणे, गजानन बोरसे, अतुल बाजोळे, नामदेव माळी, ऋत्विक सोनवणे, नरेंद्र बोरसे, शिवप्रसाद निळे, संजीव सोनवणे, एकनाथ माळी सुधाकर बोरसे, रमेश निळे, एकनाथ सपकाळ, प्रमोद बाजोळे, गजानन बोरसे, धनराज पाचपोळ, रितेश सोनोने, उत्तम बोरसे, गोपाळ बोरसे, नंदू बोरसे, नारायण बोरसे, संदीप लांडगे व परिसरातले सर्व शेतकऱ्यांना संकटमुक्त केल्याबद्दल समस्त गावकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, माजी न.प उपाध्यक्ष महादेव वनारे यांचे आभार मानले आहेत.

# जिल्ह्यात 2 हजार 500 लिटर पेट्रोलीयमसदृश पदार्थाचा साठा जप्त

**◆ जिल्हा पुरवठा विभागाची धडक कारवाई, पातूर-मेडशी रोडवरील गोदामवर धाड**

प्रतिनिधी २ जून

**अकोला :** जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार पेट्रोलीयम पदार्थाची साठवणूक करणाऱ्यांवर कडक नजर ठेवण्यात येत आहे. या अनुषंगाने १ जून रोजी संध्याकाळच्या सुमारास पातूर शहराजवळील पातूर-मेडशी महामार्गावरील शेतकरी ढाब्यासमोर असलेल्या एका टिनशेड गोदामावर जिल्हा पुरवठा विभागाने थाड टाकली. या थाडीत मोठ्या प्रमाणात पेट्रोलीयमसदृश पदार्थाचा साठा आढळून आला आहे. या कारवाईत जवळपास दोन ते अडीच हजार लीटर पेट्रोल-डिझेलसदृश ज्वलनशील पदार्थ ताब्यात घेण्यात आला. तसेच एक टँकरही घटनास्थळी आढळून आला. या धडक कारवाईमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, अवैधरीत्या पेट्रोलीयमसदृश पदार्थाची साठवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी नुकतेच जिल्ह्यात ज्वलनशील पदार्थांची बेकायदेशीर साठवणूक न करण्याबाबत कठोर आदेश जारी केले होते. मात्र, काही भागांमध्ये अद्यापही मोठ्या प्रमाणावर अशा पदार्थांचा साठा केला जात असल्याची माहिती प्रशासनाला मिळत होती. याच पार्श्वभूमीवर अकोला जिल्हा पुरवठा विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पातूर-भेडशी महामार्गावरील शेतकरी ढाब्यासमोरील एका गोदामात मोठ्या प्रमाणात ज्वलनशील पदार्थ साठवून ठेवण्यात आल्याची टीप मिळाली. त्यानुसार पुरवठा विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाड टाकून सुमारे दोन ते अडीच हजार लीटर पेट्रोलीयम पदार्थाचा साठा आढळून आल्याने तो ताब्यात घेण्यात आला. कारवाईदरम्यान अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी उपस्थित असून जप्त करण्यात आलेल्या पदार्थाची तपासणी आणि पंचनामा दोन पंचासमक्ष करण्यात येऊन ताब्यात घेण्यात आला. तसेच जप्त केलेल्या पेट्रोलीयमसदृश पदार्थाचे प्रत्येकी ३ नमुने प्लास्टिक बॉटलमध्ये वेगळे काढून घटनास्थळी पंचासमक्ष सीलबंद करून ताब्यात घेतले, घटनास्थळी हजर असलेल्या व्यक्तीला मुद्देमालाबाबत विचारपूस करून नाव-गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मोहम्मद समीर मोहम्मद हाशम रा. हमजा प्लॉट जिलानी किराण्याजवळ वाशिम रोड अकोला व दुसऱ्याचे नाव मोहम्मद सोहेल मोहम्मद जहूर फिरदोस कॉलनी लक्कडगंज अकोला असे सांगितले. तसेच हा व्यवसाय आम्ही करीत असल्याची कबुली दिली. या प्रकरणी संबंधितांकडे साठवणुकीसाठी आवश्यक परवाने व कागदपत्रे आहेत की नाहीत, याची चौकशी सुरू आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार, निरीक्षण अधिकारी पातूर शीतल मोरखेडे, पराग खंडारे, तहसील कार्यालय पातूर कनिष्ठ लिपीक अक्षय गोरे आदींनी केली. पुढील कारवाई जिल्हा पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.

**१७ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त**

पेट्रोलीयमसदृश पदार्थाच्या २०० लीटर वजनाच्या ११ भरलेल्या टाक्या व १ अर्धवट भरलेली टाकी, निळ्या रंगाच्या २०० लीटर रिकाम्या टाक्या, दोन मोटरपंप (लहान-मोठे), मापे, १ डीझेल नोडल मशीन बंद पडलेली, घरगुती वापराचे सिलिंडर व शेगडी, २० लीटर क्षमतेच्या ४ रिकाम्या कैन आणि एक इंडियन ऑइल लिहिलेला रिकामा (१२ केएल क्षमता) टैंकर क्र. एमएच ०४ ईवाय ८२८७, असा एकूण अंदाजे १७ लाख ४७ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मृग नक्षत्र अवघ्या नऊ दिवसांवर बळीराजा शेती कामात व्यस्त

प्रतिनिधी २ जून

**◆ शेतीची कामे अंतिम टप्प्यात**



**अकोला :** आजकाल ग्रामीण भागातील शेत शिवार शेतकरी शेतमजुरांच्या लगबगिने गजबजलेली आहेत. मृग नक्षत्र अवघ्या नऊ दिवसांवर आल्याने, हंगामापूर्वीच्या शेती कामांना वेग आला आहे. उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेचा सामना केल्यानंतर, जिल्ह्यातील शेतकरी आता मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत आहेत. पावसाच्या पहिल्या सरींपूर्वी आपली शेतं पूर्णपणे तयार करण्यासाठी शेतकरी रात्रंदिवस अथक परिश्रम करत आहेत. ग्रामीण भागात हे एक दृश्य दिसत आहे. आजकाल नांगरणी, वखरणी, खोदकाम, शेतातील ढेकळे फोडणे आणि शेतं सपाट करणे यांसारखी शेतीची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी अनेक शेतकरी आपल्या शेतांना शेणखत घालण्यात व्यस्त आहेत, तर काही भागांमध्ये शेतांच्या बांधांची दुरुस्ती केली जात आहे. ग्रामीण भागात सकाळपासूनच शेतात ट्रॅक्टरचा आवाज आणि शेतकऱ्यांची लगबग ऐकू आणि दिसून येत आहे. ट्रॅक्टरच्या आधुनिक पद्धतीसोबतच, काही ठिकाणी शेतकरी अजूनही बैलांच्या जोड्या वापरून पारंपरिक नांगरणी करताना दिसून येत आहेत. भरघोस उत्पन्न आणि फायदेशीर खरीप हंगाम सुनिश्चित करण्यासाठी, शेतकऱ्यांनी खते आणि बियाणे खरेदी करण्यास सुरुवात केली असून ते सखोल नियोजनात व्यस्त आहेत.

**पावसाची प्रतीक्षा**

◆ दरवर्षीप्रमाणेच, शेतकऱ्यांच्या आशा केवळ मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहेत. वेळेवर आणि समाधानकारक पाऊस पडल्यास खरीप हंगाम यशस्वी होईल, अशी आशा शेतकरी व्यक्त करत आहेत.

# जिल्हा नियोजन समितीची ५ जूनला सभा

प्रतिनिधी २ जून

**अकोला :** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची सभा दि. ५ जून रोजी दु. १ वा. नियोजनभवन येथे आयोजिण्यात आली आहे.

सभेच्या विषयसूचीनुसार गत सभेचे इतिवृत्तवाचन व अनुपालन, जिल्हा वार्षिक योजनेत- सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना यांच्या २०२५-२६ च्या खर्चास मान्यता देणे, सन २०२६-२७ या वर्षाचा नियोजन आढावा आदी विषयांवर चर्चा होणार आहे. त्यामुळे या सभेकडे जिल्हा वासियांचे लक्ष लागले आहे.

# रिजर्व माता मंदिर रस्तावरील मोठी फांदी धोकादायक



प्रतिनिधी २ जून

**अकोला :** शहरातील रामदास बागडे चौक ते रिझर्व माता मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एका जुन्या पिंपळाची मोठी फांदी अत्यंत धोकादायक झाली आहे ही फांदी सोसाट्याच्या वाऱ्याने केव्हाही कोसळू शकते. या रस्त्याने नागरिकांची नेहमीच येजा सुरू असते. या झाडाखाली काही गॅरेज सुद्धा आहेत. सोमवारी सोसाट्याच्या वाऱ्याने स्टेशन परिसरात झाड कोसळल्याने मोटरसायकलींचे मोठे नुकसान झाले. हे पाहता या पिंपळाच्या मोठ्या फांदीमुळे केव्हाही मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे या रस्त्यावर मंदिर व मस्जिद असल्याने फांदी तुटून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता पाहता महापालिकेच्या संबंधित विभागाने ही फांदी त्वरित हटवावी अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत.

# खाजगी रुग्णालयांना आता 24 तासांच्या आत बालमृत्यूंची नोंद करणे बंधनकारक

**◆ एचएमआयएस (HMIS) प्रणालीमध्ये करावी लागेल नोंद**

प्रतिनिधी २ जून

**अकोला :** बालमृत्यू कमी करण्यासाठी आणि प्रत्येक बालमृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये, ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाच्या मृत्यूची माहिती २४ तासांच्या आत स्थानिक सार्वजनिक आरोग्य संस्थेला कळवणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील सर्व खाजगी रुग्णालये, प्रसूतिगृहे, बाल रुग्णालये आणि मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयांसाठी हे अनिवार्य करण्यात आले आहे. निर्धारित वेळेत माहिती न कळवणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जाऊ शकते.

**रुग्णालये वेळेवर माहिती देत नाहीत.**

खाजगी रुग्णालयांकडून वेळेवर आणि अचूक माहितीच्या अभावामुळे, प्रत्यक्ष आकडेवारीत तफावत निर्माण होत होती. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, सर्व खाजगी आरोग्य संस्थांची एचएमआयएस (HMIS)



प्रणालीवर नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सरकारने निर्देश दिले आहेत की, ज्या खाजगी रुग्णालयांची अद्याप एचएमआयएस प्रणालीशी जोडणी झालेली नाही, त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक किंवा नगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडून तात्काळ युझर आयडी आणि पासवर्ड मिळवावा. त्यांनी जवळच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेला मासिक मृत्यूचा तपशील देखील प्रदान करावा. याच्या आधारे बालमृत्यू कमी करण्यासाठी प्रभावी धोरणे विकसित केली जाऊ शकतात. राज्य सरकारने स्थानिक आरोग्य प्राधिकरणांना खाजगी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देण्याचे निर्देशही दिले आहेत. यात निष्काळजीपणा करणाऱ्या विरोधात कड़क कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत

# वाऱ्यामुळे केळी पिकाचे नुकसान

प्रतिनिधी २ जून

**तेल्हारा :** तालुक्यातील सौंदळा येथील राधाबाई समाधान गाढे व गोपाल समाधान गाढे यांच्या शेतातील केळीचे पीक वाऱ्यामुळे जमीनदोस्त झाल्याने या शेतकऱ्याचे अंदाजे ५ लाखाचे नुकसान झाले. गाढे यांनी ३ एकर शेती मध्ये केळी पिकाची पेरणी केली होती. आता काही दिवसातच केळी तोडणी करून बाजारपेठमध्ये जाणार तोच गाढे कुटुंबावर अस्मानी संकट ओढवले आहे. जिल्हा प्रशासनाने या बाबत दखल घेत शेतीचा पंचनामा करीत आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राधाबाई समाधान गाढे या महिला



शेतकऱ्याने केली आहे.

# जन्म – मृत्युच्या आलेल्या तक्रारीबाबत स्थायी समिती सभापती अग्रवाल यांनी भरतीया रूग्णालय येथे दिली भेट

प्रतिनिधी २ जून

**अकोला :** दि. १ जून २०२६ रोजी अकोला महानगरपालिका स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्याकडे जन्म – मृत्यु विभागाशी संबधीत तक्रारी घेवून बरेच नागरीक आले असता मागील ७ ते ८ दिवसापासून सीआरएस पोर्टल बंद असल्याने नागरीकांना जन्म - मृत्युचे दाखले प्राप्त करुन घेण्याकरिता अडचण येत असल्याचे नागरीकांनी सांगितले. सदर परिस्थितीची पडताळणी करण्याकरिता मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी भरतीया रुग्णालय येथे प्रत्यक्ष भेट दिली असता सदर ठिकाणी जवळपास १०० ते १५० नगरीक हे जन्म - मृत्यु चे दाखले काढण्याकरिता प्रतिक्षेत उभे असल्याचे निदर्शनास आले. यावेळी



सभापती अग्रवाल यांनी नागरिकांशी संवाद करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच त्याठिकाणी नागरीकांना पिण्याचे पाणी सुध्दा संपल्याचे दिसून आले. तसेच सदर कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचा-यांकडून नागरीकांना व्यवस्थित माहिती दिली जात नसल्याची नागरीकांनी सांगितले, तसेच भरतीया रूग्णालय येथे येणा-या नागरीकांसाठी बसण्याची कोणतीही व्यवस्था दिसून आली नाही. रूग्णालयाच्या परिसरात दगड, विटांचे टुकडे मोठ्या प्रमाणात पसरलेले दिसले, त्यामुळे तेथून नागरीकांना चालता सुध्दा येत नसल्याचे दिसून आहे. नागरीक हे जन्म - मृत्यु चे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याकरीता जवळपास चार ते पाच तासापासुन प्रतिक्षेत असल्याचे दिसून आले. नागरीकांप्रती कर्मचा-यांची वागणूक ही सहकार्याची अपेक्षित असतांना कर्मचारी हे बेजबाबदारपणे वागत असल्याचे तेथे उपस्थित असलेल्या नागरीकांकडून सांगण्यात आले. याचसोबत विवाह नोंदणी कार्यालयामध्ये दररोज जवळपास ३० ते ३५ विवाहाची नोंद होत असल्याचे निदर्शनास आले आहे, आणि विवाह नोंदणी करीता येणा-या वर, वधू, आई-वडील, साक्षीदार यांचेकरीता बसण्याची सुध्दा व्यवस्था नाही. तसेच सदर कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या दिव्यांग महिला कर्मचारी अधिकारी यांचे करीता स्वच्छता गृहाची व्यवस्थाही आढळून आलेली नाही. यावेळी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी या ठिकाणी पिण्याच्या पाणीची मुबलक व्यवस्था करणे, नागरिकांना येथे येण्यासाठी होणारी गैरसोय टाळण्याकरिता परिसरात पेवर्स ब्लॉक लावणे, नागरिकांना बसण्यासाठी बेंचेसची व्यवस्था करणे, कर्मचा-यांच्या बसवण्याची व्यवस्था व्यवस्थितरित्या करणे, तसेच जन्म - मृत्यु चे दाखलेसाठी येणा-या नागरिकांना चांगली वर्तणूक ठेवून व अचूक माहिती सांगणे आदींबाबत यावेळी सुचना केल्या. यावेळी नगरसेवक सिध्दार्थ उपरवट, नितीन ताकवाले, विनोद मापारी, मनपा उपायुक्त विजय पारतवार, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी रूची पहूरकर, माजी नगरसेवक तुषार भिरड यांचेसह भाजपा पदाधिकारी व कर्मचा-यांची उपस्थिती होती.

# बाळापुर शहराला होत आहे दूषित पाणीपुरवठा

**◆ नागरिकांचे आरोग्य धोक्यात ◆ जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन**

प्रतिनिधी २ जून



**बाळापूर :** नगर परिषद अंतर्गत येत असलेल्या बाळापूर शहरात रोज गावातील नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याने गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच गावात सर्वत्र स्वच्छतेचा अभाव असल्याने लहान मुले तसेच वयोवृद्ध नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे..

बाळापूर गावातील पाण्याच्या टाकी मधून फिल्टर द्वारे गावातील नागरिकांना अशुद्ध व पिवळे पाणी पुरवठा होत असल्याने नगरपरिषद प्रशासनाबाबत गावकऱ्यांमधून तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली जात आहे. यापूर्वी नगरपरिषद प्रशासनाला गावातील नागरिकांनी अनेकदा निवेदन दिली तसेच आमरण उपोषण सुद्धा केले तरीसुद्धा बाळापुर नगर परिषद मार्फत कोणतीही उपाय योजना केली गेली नाही. यासोबत बाळापूर गावात बहुतांश ठिकाणी अस्वच्छता दिसून येत असल्याने याचा विपरीत परिणाम गावातील लहान मुले तसेच वयोवृद्ध नागरिक यांच्या आरोग्यावर पडत आहे. याच बरोबर बाळापूर नगर परिषद अंतर्गत लावण्याचे आलेले बहुतांश स्ट्रीट लाईट बंद असून संबंधित कंपनीद्वारे स्ट्रीट लाईट बंद असताना सुद्धा नगर परिषद प्रशासन त्यांच्या कडून स्ट्रीट लाईट दुरुस्त करून घेत नसल्याने गावात रात्रीला अंधाराचे सावट सरत्र दिसून येत असल्याने नागरिक चांगलेच वैतानगले असून याबाबत आज बाळापूर शहरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेत गावात पुरवठा होत असलेले दूषित पाणी बॉटलमध्ये आणून त्यांना दाखविले. बाळापुर शहरातील नागरिकांच्या समस्या जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सोडवाव्या अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# हरवलेला मुलगा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पालकांच्या स्वाधीन

प्रतिनिधी २ जून

**◆ आधार नोंदणीच्या माध्यमातून मुकबधिर बालकाचे कुटुंब शोधण्यात यश**

**अकोला :** अकोला रेल्वे स्थानक येथे ८ एप्रिल २०२६ रोजी एक मुकबधिर बालक पालकांविना भटकताना रेल्वे चाइल्ड हेल्पलाइनच्या कर्मचाऱ्यांना आढळून आला. संबंधित बालकाला बाल कल्याण समिती अकोला यांच्या आदेशानुसार शासकीय बालगृहात दाखल करण्यात आले होते. आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत बालकाला त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. सदर बालकाचा पत्ता व कुटुंबाचा शोध घेण्यासाठी बाल कल्याण समितीने जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडुलकर यांना निर्देश दिले. त्यानुसार शासकीय मुकबधिर विद्यालयातील शिक्षिकांच्या मदतीने बालकाशी सांकेतिक भाषेत संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यातून



आवश्यक माहिती मिळू शकली नाही. त्यानंतर सुनील लाडुलकर यांनी बालकाची आधार नोंदणी केली. सुमारे २० दिवसांनंतर आधार ग्राहक सेवा क्रमांक १९४७ वर संपर्क साधला असता संबंधित नोंदणी डुप्लिकेट असल्याने रद्द झाल्याची माहिती मिळाली. बालक हरवलेला व मुकबधिर असल्याने त्याचा पत्ता शोधण्यासाठी विशेष विनंती करण्यात आली. ग्राहक सेवा केंद्राने तक्रार नोंदवून घेतली. यानंतर १५ दिवसांनी बालकाचा जुना आधार नोंदणी क्रमांक प्राप्त झाला. पुढील प्रक्रियेसाठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महा-आयटी, प्रमोद ठाकूर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांच्या माध्यमातून संबंधित माहिती मुंबई येथील UIDAI कार्यालयाकडे पाठविण्यात आली. तेथून बालकाचा आधार क्रमांक उपलब्ध झाला. दि. २९ मे रोजी बालकाला तहसील कार्यालय, अकोला येथे नेण्यात आले. तेथील ऑपरेटर सतीश पडगण यांनी आयरिस(डोळ्यांचे) स्कॅनिंग करून पुढील प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर बालकाची संपूर्ण माहिती उपलब्ध झाली व त्याच्या वडिलांचा मोबाईल क्रमांक प्राप्त झाला. सदर क्रमांकावर संपर्क साधून बालक व त्याच्या कुटुंबीयांमध्ये व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधण्यात आला. अनेक दिवसांनंतर आपल्या मुलाला पाहून पालकांच्या तसेच बालकाच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. त्यानंतर सुनील लाडुलकर यांनी पालकांना पुढील कायदेशीर प्रक्रियेची माहिती दिली. आज दि. १ जून २०२६ रोजी बालकाचे आई-वडील व काका अकोला येथे आले. मा. बाल कल्याण समिती, अकोला यांनी सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून बालकाला प्रवेशमुक्त केले. त्यानंतर अकोला जिल्ह्याच्या मा. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते बालकाला त्याच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड. अनीता गुरव, सदस्य राजेश देशमुख, कु. प्रांजली जयस्वाल, डॉ. विनय दांडले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, शासकीय बालगृहाच्या अधीक्षिका सौ. जयश्री हिवराळे, शिक्षक संजय मोटे, काळजीवाहक राजेश अंभोरे, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडुलकर व सुनील सरकटे तसेच स्वयंसेवी संस्थेचे महेंद्र गनोदे उपस्थित होते. मुकबधिर व हरवलेल्या बालकाला त्याच्या कुटुंबाशी पुन्हा एकत्र आणण्यासाठी सुनील लाडुलकर यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे ही यशस्वी पुनर्मिळवणी शक्य झाली असून, जिल्हा बाल संरक्षण यंत्रणेच्या कार्याचा हा एक उल्लेखनीय असल्याचे मत जिल्हाधिकारी यांनी मांडले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135